


आजचा रंग : जांभळा

जांभळा रंग म्हणजे

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. २२ ऑक्टोबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : २४ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


## इंग्लंडचा सलग दुसरा दारुण पराभव; अफ्रिकेने २२९ धावांनी सामना जिंकला

✔ ९९९९९९९९९९९ : विश्वविजेत्या इंग्लंडचा सलग दुसरा दारुण पराभव झाला. दक्षिण आफ्रिकेनं ४०० धावांचा डोंगर उभा केल्यानंतर इंग्लंडची तारांबळ उडाली. चारशेचा पाठलाग करताना आठव्या षटकांतच इंग्लंडची ५ बाद ६७ अशी स्थिती झाली. बेन स्टोक्स ५ धावांवर बाद झाला. ४ बाद ३८ अशी स्थिती झाल्यानंतर हॅरी ब्रुक आणि बटलरने आक्रमण करण्याचा प्रयत्न केला, पण बटलर अवघ्या १५ धावांवर बाद झाला. दहाव्या क्रमांकावर आलेल्या मार्क वूडच्या नाबाद १७ चेंडूतील ४३ धावा आणि नवव्या क्रमांकावर आलेल्या ॲत्कीनसनच्या ३५ धावांच्या खेळीमुळे इंग्लंडची अब्रू काहीशी वाचली.

# ‘त्या’ डॉक्टरांवर कारवाई कधी? एखाद्याचा नाहक बळी गेल्यावर!

## तिऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टरांची मनमानी; जिवाची पर्वाह कोणाला?

✔ सुराज्य/सोलापूर

**उद्धट, उमर्ट आणि प्रशासकीय कामात हलगर्जीपणा, बेजबाबदारपणा दाखविण्याऱ्या तिऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्रातील संबंधित डॉक्टरांवर कारवाई करावी. अन्यथा भाजप महिला आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा भाजप महिला आघाडीच्यावतीने भारतीय जनता पार्टीच्या शहर चिटणीस संपदा जोशी आणि भाजप कार्यकर्ते संकेत किल्लेदार यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.**

‘आरोग्याची हमी की मृत्यूचा सापळा’ भाग-४

आम्ही रहिवासी भत्ता घेत नाही. शासनाचा पगार घेत नाही. संबंधित घटनेची विचारपूस करता विषयांतर करण्याचा प्रयत्न केला गेला. डोणगाव, पाथरी आरोग्य केंद्रात डॉक्टर उपलब्ध नाहीत. येथे एमबीबीएस डॉक्टरांची खरी गरज आहे. ठिकाणी डॉक्टर्स का उपलब्ध होत नाहीत?

दि. १६ सप्टेंबर २०२३ रोजीची घटना. तिऱ्हे येथील एक महिला प्रसुतीसाठी दाखल झाली. सायंकाळी साडे सात वाजता तिऱ्हे आरोग्य केंद्र बंद अवस्थेत होते. वाऱ्यावर सोडून सर्व कर्मचारी पसार झाले होते. येथे कोणीच वाली नव्हते. सायंकाळी सात वाजल्यापासून ते रात्री एक वाजेपर्यंत त्या मातेने कळ सोसला. प्रचंड वेदना होऊनही कोणीही काही करू शकत नव्हे. रात्री एक वाजता एका आशावर्करकरवी तिची सुरळीत प्रसुती झाली. सुदैवाने ती माता व बाळ सुखरुप आहेत. मात्र अशाप्रसंगी जर त्या दोन निष्पाप जिवाचे बरे वाईट झाले असते तर? याला जबाबदार कोण?

प्रशासनाने प्रत्येक आरोग्य केंद्रामध्ये सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. २४ तास सोयी उपलब्ध करून दिलेल्या असताना त्यावेळी सातत्याने फोन करूनही एकही डॉक्टर, सिस्टर उपलब्ध नव्हते. सातआठ वेळा फोन केल्यानंतर एका आशा वर्करला पाठविण्यात आलं. त्यानंतर तिने त्या मातेची प्रसुती केली. अर्धातासदेखील निगराणीखाली न ठेवता परत त्यांना घरी पाठवून देण्यात आल. दरम्यान, एका गरोदर मातेचे किती हाल झाले, असतील, दिलेवारीचा काळ म्हणजे एका महिलेचा पुर्नजन्म असतो. नवीन जीव जन्माला येत असत. सात ते आठ तास तिने वेदना सहन केल्या.

तिऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्रात एक महिला व व पुरुष असे दोन डॉक्टर आहेत. हे सकाळी ११ वाजता येतात आणि दुपारी १ वाजता निघून जातात. दिवसभर हे केंद्र वाऱ्यावर सोडले जाते. गेल्या आठ वर्षांपासून हे दोघेही डॉक्टर एकत्र काम करतात. गेल्या १५ वर्षापासून ते एकत्र सेवा बजावत आहेत. प्रशासकिय बदली झालेली असताना ती बदली थांबवून कायम ठेवत येथे पुन्हा रुजू झाले. इतके वर्षे थांबण्याचे कारण काय? प्रशासाने तातडीने योग्य ती कारवाई केली पाहिजे. भविष्यात असे प्रसंग घडू नयेत, यासाठी यांच्यावर कडक कारवाई करावी. त्यांना निलंबित करावे. गेल्या तीन महिन्यापूर्वी येथील पुरुष डॉक्टरांची प्रशासकिय बदली झाली होती. ती बदली तशीच ठेऊन कायम राहण्याचा आदेश मिळवला आणि तिऱ्हे येथे पुन्हा कायम आहेत. त्या डॉक्टरांविरुद्ध कारवाईची मागणी तिऱ्हे ग्रामपंचायतीसह ग्रामस्थ, परिसरातील रुग्ण, विविध सामाजिक संघटनेने तक्रार केली आहे.

### ‘त्या’ डॉक्टरांविरुद्ध तक्रारीच तक्रारी...

तिऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्रातील त्या पुरुष डॉक्टराची दि. १० जून २०२३ रोजी महिला पोलीस प्रशिक्षण केंद्र, केगांव सोलापूर क्लिनीक येथे प्रशासकीय बदली झाल्याचे आदेश आरोग्य सेवा आयुक्तालयाकडून प्रशासनाकडून देण्यात आले.




आरोग्य सेवा पुणे मंडळाच्या उपसंचालकांनी दि. ४ सप्टेंबर २०२३ रोजी पुन्हा तिऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्रात कायम राहण्याचा आदेश दिला.

तिऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्रातील औषध निर्माण अधिकारी यांच्या दि. ५ नोव्हेंबर २०२० आणि बेलाटी उपकेंद्रातील आरोग्य सेविका यांच्या दि.९ नोव्हेंबर २०२० रोजीच्या तक्रारीवरून जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी दि. १८ जानेवारी २०२१ रोजी चौकशीचे आदेश दिले.

वंचित बहुजन आघाडी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट, भारतीय जनपा पार्टी, शिवसेना,डॉ. आंबेडकर युथ फाऊंडेशन, कुंभारी उपकेंद्रातील आरोग्य सेविका, परिचर, तिऱ्हे, डोणगाव, बेलाटी, औराद, कवठे, तेलगाव, पाथरी, तिऱ्हे, डोणगाव ग्रामस्थांचा ठराव अशा अनेक तक्रारी आजपर्यंत शासन दरबारी दाखल झालेल्या आहेत.

### ‘सुराज्य’शी बोलताना संपदा जोशी, संकेत किल्लेदार म्हणाले,

पवित्र अशा डॉक्टरी पेशाला कलंकीत करण्याचा प्रकार तिऱ्हे आरोग्य केंद्रात घडला. केवळ प्रसुतीसाठी आलेल्या त्या मातेचाच नव्हे तर तिच्या उदरातील बाळाच्या जिवाशी खेळण्याचा प्रकार नव्हे तर काय? संबंधित घटनेची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला तर उलट त्यांच्याकडून उर्मट आणि उद्धट वर्तणूक मिळाली. अशा बेजबाबदार डॉक्टरांची अन्यत्र दुसरीकडे जरी बदली केली तरी त्यांचा उद्धट आणि उर्मटपण जाणार नाही. त्यामुळे त्यांना कायमचे बडतर्फ करावे. तरच त्या मातेला न्याय मिळणार आहे. हा निंदनीय प्रकार आहे.


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री



शुद्ध मनानं आम्ही दिलेल्या संधीचं सोने करा...

आम्ही पाया मजबूत बनविला आहे... सकारात्मक ध्येयाकडे वाटचाल करा!

- सारथी संस्थेमार्फत अधिछात्रवृत्ती शिष्यवृत्ती (पीएच.डी. करीता) योजनेंतर्गत मराठा समाजाच्या २१०९ विद्यार्थ्यांना रू. ९७ कोटी वितरीत.
- सारथीकडून प्रशिक्षण घेतलेल्या ५१ विद्यार्थ्यांची UPSC (१२ IAS, १८ IPS, ८ IRS, १ IFS, २ Indian Forest Service व इतर सेवा १० ) तर ३०४ विद्यार्थ्यांची MPSC मार्फत निवड.
- मराठा समाजाच्या ७५ विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्तीचा लाभ व रू. २१ कोटीची तरतूद.
- छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती मागील वर्षी ३२,५३९ विद्यार्थ्यांना रु. ३१ कोटी वितरित केले. तसेच या वर्षी ४४,१०२ विद्यार्थ्यांना रु. ४२ कोटी मंजूर करण्यात आले.
- सारथीमार्फत ३५,७२६ विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात आले.
- शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम सारथीमार्फत सुरु करण्यात आलेला आहे.
- सारथी संस्थेचे पुणे येथील मुख्यालय इमारत आणि ६ विभागीय कार्यालये आणि लातूर व कोल्हापूर येथील उपकेंद्र आणि वसतिगृहासाठी विनामूल्य जमीन उपलब्ध करुन दिली. तसेच बांधकामासाठी रु. १०२४ कोटी मंजूर.
- डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह योजनेंतर्गत ३,७९,३७३ विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता रु. १२९३ कोटी वितरित.
- मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेप्रमाणे निर्वाह भत्त्यात भरीव वाढ करण्याचा निर्णय. प्रती विद्यार्थी, प्रती वर्ष रु.६० हजार महानगराच्या ठिकाणी, रु.५१ हजार, विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी, रु.४३ हजार, जिल्ह्याचे ठिकाणी आणि रु.३८ हजार तालुक्याचे ठिकाणी निर्वाह भत्ता विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात डीबीटीव्दारे वितरीत करणार.
- राजर्षि छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत १७,५४,४९४ विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणासाठी रु.९,२६२ कोटी मंजूर.

मा. सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय
EWS करिता १० % आरक्षणावर मोहर उमटवली.
EWS आरक्षणाचा मराठा समाजाला लाभ

- EWS अंतर्गत १० टक्के आरक्षणातून विविध शैक्षणिक अभ्यासक्रमांमध्ये ३१,००० विद्यार्थ्यांपैकी ७८ टक्के मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश. तसेच एमपीएससी मार्फत शासकीय सेवेत ६५० उमेदवारांपैकी ८५ टक्के मराठा समाजाच्या उमेदवारांना नियुक्ती.
- अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत वैयक्तिक आणि गट कर्ज व्याज परतावा योजने अतंर्गत ७०,००० लार्भार्थ्यांना रू. ५,१६० कोटी बँक कर्ज मंजूर. त्यावरील रू. ५७२ कोटीचा व्याज परतावा वितरित.
- महामंडळाकडून ३५ गट प्रकल्पांना रु. ३.३५ कोटी कर्ज वितरित.
- मराठा आरक्षण कायदा मा. सर्वोच्च न्यायालयाने अवैध ठरविल्यामुळे शासकीय सेवेत निवड होऊन नियुक्ती न मिळालेल्या १५५३ उमेदवारांना अधिसंख्य पदावर नियुक्ती देण्यात आली.
- विविध न्यायालयीन प्रकरणात नोकरभरती प्रक्रिया रखडलेल्या उमेदवारांसाठी धोरणात्मक निर्णय घेवून MPSC व अन्य शासकीय सेवेत २,४०० उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या. SEBC मधून EWS व Open प्रवर्गाचा विकल्प देऊन उमेदवारांना नियुक्त्या देण्याचा ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतला.
- मराठा आरक्षण आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्या 36 व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी रु.१० लाखाची मदत दिली. तसेच २० व्यक्तींच्या वारसांना एस.टी. महामंडळात नियुक्त्या दिल्या.
- मराठा आंदोलकांवरील दाखल गुन्हे मागे घेण्यात आले.
- मराठा समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी मराठा आरक्षण व सुविधा मंत्रिमंडळ उपसमिती धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी कार्यरत आहे.
- **मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासासाठी... शासन कटिबध्द.**



देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र | एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र | अजित पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र

सामान्य प्रशासन विभाग (सा.वि.स.), महाराष्ट्र शासन

# मद्यपींच्या खिशाला बसणार दणका

**✔ सुराज्य/मुंबई**

**राज्य सरकारने परमिट रुममध्ये विक्री होणाऱ्या मद्यावरील 'व्हॅट'मध्ये ५ टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता बार, क्लब आणि कॅफेमध्ये जाऊन मद्याचा आस्वाद घेणाऱ्या मद्यशौकिनांना अतिरिक्त पैसे मोजावे लागणार आहेत. सरकारने शुक्रवारी याबाबतचा निर्णय जाहीर केला. बारमधील मद्यदरात वाढ होणार असली तरी स्टार हॉटेल्समधील मद्याच्या दरावर कोणताही परिणाम होणार नाही. कारण तेथील व्हॅट आधीपासूनच २० टक्के इतका आहे.**

## राज्य सरकारकडून व्हॅटमध्ये ५ टक्क्यांची वाढ

सरकारने व्हॅटमध्ये वाढ केल्यानंतर बारचालकांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. सरकारने आधीच अबकारी परवाना शुल्क वाढवल्याने व्यावसायावर ताण आलेला असताना आता व्हॅटमध्ये ५ टक्क्यांची वाढ करण्यात आल्याने मद्याचे दर वाढणार असून याचा व्यावसायावर परिणाम होणार आहे, असं बारचालकांचं म्हणणं आहे. एकीकडे पर्यटन आणि महसूलवाढीसाठी सर्व राज्यांमध्ये स्पर्धा सुरू असताना महाराष्ट्र सरकारने हा निर्णय घेतल्याने आपल्या उद्दिष्टांना धक्का पोहोचणार असल्याचं मतही बारचालकांनी व्यक्त केलं आहे.



सरकारच्या निर्णयावर प्रतिक्रिया देताना पश्चिम भारत हॉटेल्स आणि रेस्टॉरंटचे प्रमुख प्रदीप शेट्टी यांनी म्हटलं आहे की, 'व्हॅटमध्ये वाढ करण्याचा सरकारचा निर्णय अनपेक्षित आहे. आधीच अबकारी परवाना शुल्कात वाढ करण्यात आलेली असताना आता व्हॅटमध्येही वाढ झाल्याने रेस्टॉरंट आणि बारमध्ये मद्याचे दर वाढतील. आपण अशा युगात आहोत, जिथे इतर राज्य स्पर्धा करत आहेत, अर्थव्यवस्था चालवण्यामध्ये पर्यटनाची शक्ती ओळखून उत्पादन शुल्क कमी केले जात आहे. गोवा, चंदीगड आणि हरियाणा ही अशी काही उदाहरणे आहेत,' असं प्रदीप शेट्टी म्हणाले. दरम्यान, सरकारच्या या निर्णयाचा रेस्टॉरंटवर मोठा परिणाम होणार असून यामुळे निर्माण होणाऱ्या रोजगारावरही विपरीत परिणाम होईल, असं आहार संघटनेचे प्रमुख सुकेश शेट्टी यांनी म्हटलं आहे.



## हिवाळी अधिवेशन १० दिवसात गुंडाळणार

**✔ नागपूर :** महाराष्ट्र विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचं तात्पुरतं वेळापत्रक जाहीर झालं आहे. ७ डिसेंबर ते २० डिसेंबरला नागपुरात हिवाळी अधिवेशनाचं आयोजन करण्यात आलं आहे.

मात्र, यंदाचं हिवाळी अधिवेशन अवघ्या १० दिवसांत गुंडाळलं जाण्याची शक्यता आहे. दरम्यान दरवर्षी हिवाळी अधिवेशन शुक्रवारी संपते. मात्र, यावर्षी अधिवेशन २० डिसेंबर म्हणजे बुधवारीच गुंडाळले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे हिवाळी अधिवेशनाच्या कामकाजाला दोन दिवसांची कात्री लावली जाणार का असा प्रश्न निर्माण झाला आहे.

अधिवेशनाच्या ७ डिसेंबर ते २० दरम्यान दहा दिवसाच्या कामकाजाची तात्पुरती दिनदर्शिका जाहिर झाली आहे. म्हणजे ७ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या अधिवेशनाचे कामकाज २० डिसेंबरपर्यंतच नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे २० तारखेलाच अधिवेशन गुंडाळलं जाणार का असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

---

# डोळे दीपवून टाकणारी समाजसेवा

***सोलापुरातील अश्विनी सहकारी रुग्णालयाचे चेअरमन तथा उद्योगपती श्री. बिपीनभाई पटेल यांचा आज वाढदिवस. अमृत महोत्सवी पार करून ते ७६ व्या वर्षात पदार्पण करत आहेत. त्यानिमित्त त्यांच्या सामाजिक कामाचा हा अल्प परिचय...***

भारतात शतकानुशतके 'सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामया' म्हणजेच सर्व लोक रोगमुक्त व्हावेत, अशी प्रार्थना केली जाते. प्रत्येक व्यक्ती निरोगी राहिल्यास, प्रत्येक कुटुंब निरोगी राहील आणि प्रत्येक दुवा जोडून शेवटी एक निरोगी भारत निर्माण होईल अशीच बिपीनभाई पटेल इच्छा व्यक्त करतात व प्रार्थना करतात. देवाकडे मागणे कमी करा आणि आभार जास्त माना, असे त्यांचे म्हणणे असते.

वयाची ७५ उंबरठे पार केलेले बिपीनभाई या वयातही तेवढ्याच उत्साहाने ३०० बेडस्‌चे अश्विनी सहकारी रुग्णालय व ५६० बेडस्‌चे एम. एम. पटेल पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित अश्विनी रुरल मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर चालवीत आहेत, जास्तीत जास्त गरीब लोकांपर्यंत महात्मा जोतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना आणि सुवर्ण आरोग्य सुरक्षा ट्रस्ट योजनेची (वाजपेयी योजना) अश्विनी ग्रामीण रुग्णालय, कुंभारीच्या माध्यमातून वंचित व गोरगरीब रुग्णांना फायदा करून दिलेला आहे. कुंभारी येथे ५६० व ४५ आयसीयू बेडस्‌चे सुसज्ज अत्याधुनिक मल्टी स्पेशालिटी व सुपर स्पेशालिटीसह रुग्णालय उभे केले आहे. त्याचा फायदा अनेक ग्रामीण भागातील रुग्णांना होत आहे. मोफत हृदयशस्त्रक्रियेसाठी ग्रामीण भागातून विशेषत: मराठवाडा, कर्नाटक येथील रुग्णांना फायदा होत आहे. एमबीबीएस बरोबर पोस्ट ग्रॅज्युएट मेडिकल कोर्सेस सुरू केलेले आहेत, त्यात विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. नुकतेच अश्विनी वैद्यकीय महाविद्यालय येथे बी. एस्सी नर्सिंग कॉलेजचे तत्कालीन पालकमंत्री ना. राधाकृष्णजी विखे पाटील व माजी गृहमंत्री सुशीलकुमारजी शिंदे यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले आहे. तसेच पूर्वीचे १ वर्ष, २ वर्षे मुदतीचे पॅरामेडिकल कोर्सेस चालू आहेत. सोलापुरात सर्व सुविधांनी युक्त अत्याधुनिक रुग्णालय असावे आणि लोकांना वैद्यकीय उपचारासाठी पुणे, हैद्राबाद, मुंबई येथे जाण्याची गरज पडू नये या हेतूने बिपीनभाई पटेल नावाच्या ७५ वर्षाच्या तरुणाने स्वत:चा बांधकाम व्यवसाय सांभाळत फार निष्ठेने हे वैद्यकीय प्रकल्प नुसते हाती घेतले नाही तर सोलापूर, उस्मानाबाद, लातूर अशा पंचक्रोशीमध्ये वैद्यकीय सेवेच्या लौकिकाचा सुगंध पसरविला.

बिपीनभाई नावाचा स्पटीकगृहाचा दीप प्रसन्नतेने तेवतो आहे. कारण या दिव्याच्या एका प्रकाशलाकेनंच लाखो लोकांच्या जीवनातील अंधार चिरला आहे. त्या रुग्णांना स्वत:च पाथेय गवसलं आहे. मुळात माउलींचे तत्त्वज्ञान हेच बिपीनभाईंच्या जगण्याचे तत्त्वज्ञान आहे. आपले पिताजी महिजीभाई आणि माताजी कमलाबेन पटेल यांच्या संस्काराचा समर्थ वारसा घेऊन बिपीनभाईंची सामाजिक क्षेत्रातील डोळे दीपवून टाकणारी घोडदौड सुरू



आहे. कासच्या पठारावर फुलं उमलतात, त्याप्रमाणे अशी गुणी माणसे समाजात अवतीभवती असतात, पण त्यांचे ढोल ताशे वाजत नाहीत, तरी त्याचं आतलं स्वयंभूपणे फुलणे मलूल होत नाही. बिपीनभाई म्हणजे ह्याच जातकुळीचा एक उल्हसित आणि झपाटलेला माणूस म्हणता येईल. समोरच्या चालत्या बोलत्या माणसाची जेवढं छान बोलता वागता येईल, तितकं छान वागायचं, आपल्यामुळे दुसऱ्याचे आयुष्य दु:खी होत नाही, एवढं भान मात्र बिपीनभाई नक्की सांभाळतात, माझं हे म्हणणे कोणाला पटेल न पटेल पण शेवटी पटेलच!

बिपीनभाईंना कोणीही भेटू द्या अथवा रुग्ण भेटू द्या, रुग्णांचे नातेवाईक भेटू द्या, मित्र भेटू द्या, समोरच्या व्यक्तींचे हसतमुखाने स्वागत करतात आणि म्हणतात हो. मी प्रयत्न करेन असे कधी त्यांच्या तोंडून ऐकले नाही. कारण बिपीनभाईंना माहीत आहे की हो म्हटल्यामुळे आयुष्य बदलू शकतो. आपण एखाद्या आजाराच्या उपचारासाठी डॉक्टरांकडे जातो, तेव्हा तो काय करतो औषधे देतो आणि आहारही सांगतो. त्याचप्रमाणे त्यांच्याकडून ज्ञान घेणे हे देखील औषध आहे. ते आपल्या मनाचे रोग बरे करतात. त्यांच्या सहवासातला हा मोठा गुण आहे. काम करीत असताना सहकाऱ्यांचे कौतुक करतात. कारण बिपीनभाईंना माहीत आहे, लोकांचे कौतुक करणे आणि त्यांना चांगले समजून घेणे महत्त्वपूर्ण लीडरशीप कौशल्याचा एक भाग आहे.

जीवनात अडचणी आल्या नसत्या तर यशाचा आनंद घेता आला नसता म्हणून बिपीनभाई नेहमी म्हणतात, 'सुख, समाधान आणि यश हवे असेल तर आवडत्या व्यवसायाची निवड करा. त्यासाठी इच्छा आणि स्वत:ला ओळखणे गरजेचे आहे. कोणत्या कामाला किती प्राधान्य द्यावयाचे हे ठरवावे आणि हे सर्व करून यश मिळविण्यासाठी निर्णय क्षमता महत्त्वाची आहे. त्यामुळे रुग्ण, रुग्णालयाचा विकास, कर्मचाऱ्यांचे हितसंबंध यासाठी निर्णय तात्काळ घेतात. योग्य आणि झटपट निर्णय तुम्हांला यशाच्या जवळ घेऊन जातात, त्यामुळे बिपीनभाईंची निर्णय घेण्याची क्षमता फार महत्त्वाची आहे.'

**तेथे कर माझे जुळती । स्मित जयांची चैतन्य फुले ।**
**शब्द जयांचे नवदीप कळे ।**
**कृतीत ज्यांच्या भविष्य उजळे ।।**
**प्रेम विवेकी जे खुलती । तेथे कर माझे जुळती ।।**

माझ्या जीवनावर सर्वाधिक प्रभाव आहे, असे माझे गुरु बिपीनभाई यांचे वर्णन करण्यासाठी बा. भ. बोरकरांच्या या इतक्या समर्पक ओळी शोधूनही सापडणार नाहीत. वयाच्या ७५ वर्षीही आजही त्यांचा दिवस ७.३० वाजता सुरू होऊन, रात्री १०.०० पर्यंत संपतो. रुग्णाला आर्थिक मदत कशी करायची, याबद्दल ते दक्ष असतात. डोक्यावर बर्फ, तोंडात खडीसाखर ठेवून कसे राहावयाचे हे त्यांनी शिकविले. त्यांनी माणसे वाचायला शिकविले. कठीण परिस्थिती कशी हाताळायची याचे धडे कृतीतून दिले. यामुळेच मी बिपीनभाईंशी स्नेहबद्ध झालो. सन १९९५ ते २०२३ पर्यंत अश्विनी सहकारी रुग्णालयाचे संचालकपद भूषवीत आहे आणि कुंभारी, अश्विनी ग्रामीण रुग्णालय येथे लायझोन ऑफिसर म्हणून कार्यरत आहे. मागासवर्गीयांना प्रवाहात आणण्यासाठी खास प्रयत्न करीत असतात. अश्विनी सहकारी रुग्णालय, सोलापूर, अश्विनी ग्रामीण रुग्णालय कुंभारी किंवा प्रायव्हेट सेक्टरमधून कॉलेजमध्ये मागासवर्गीयांना नोकऱ्या देऊन आज अनेकांचे संसार उभे केले आहेत, ते त्यांच्या यशाचे गमक आहे. स्व. किरीटभाई, हरिशभाई या बंधूंची एकत्रित साथ असलेल्या पटेल कुटुंबातील ज्येष्ठ बिपीनभाईंना त्यांची पत्नी भारतीबेन यांची साथ मिळाली. त्यांचे पुत्र मेहूल पटेल वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय कुंभारी यांची धुरा सांभाळून आज यशस्वीरीत्या वाटचाल करीत आहेत. अशा कर्मयोगी, कर्तृत्ववान, आरोग्यदाता, पॉझिटिव्ह माणसाला आज २२ रोजी साजरा होणाऱ्या ७५ व्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा.

**- अशोक लांबतुरे,**
संचालक, अश्विनी सहकारी रुग्णालय, सोलापूर.

---

# प्रकाश आंबेडकरांनी दिला इशारा

## राग समजून घ्या नाहीतर...

**✔ सुराज्य/मुंबई**

राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार आणि वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्यातील राजकीय वाद कायम चर्चेचा विषय असतो. मात्र, हे दोन्ही नेते शनिवारी ०२१ ऑक्टोबर) मुंबईच्या वाय. बी. चव्हाण सेंटरमध्ये एकत्र आले होते.

खासदार सुप्रिया सुळे यांनी दोन्ही नेत्यांमध्ये भेटही घडवून आणली आहे. यानंतर माध्यमांशी बोलताना प्रकाश आंबेडकर यांना मराठ आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे-पाटील आणि अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्या सुरू असलेल्या वादावर प्रश्न विचारण्यात आला. यावेळी त्यांनी छगन भुजबळ यांना इशारा दिला आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी सुरू



केलेल्या लढाईसंदर्भात राज्य सरकारला इशारा दिला आहे. शासनाने जरांगे पाटलांशी इमानदारीने बोलावं. त्यांना चार महिने, दोन महिने मुदत देत राहू नये. कुणी बोलत नाही, पण शासनाला सांगतो की, 'त्यांच्या गावातील २०-२५ वर्षांच्या तरुणांच्या हाताला कामं नाही. त्यांची लग्न झालेली नाहीत. या वर्गाच्या कौटुंबिक समस्याही निर्माण झाल्या आहेत, व्यक्तिगत समस्या आहेत. या वर्गाचा जरांगे पाटलांना पाठिंबा आहे. मी ते अनुभवलं आहे.

मी एकदा पाच-सहा ठिकाणी बोलणीला गेलो होतो. मुलीचे आईवडील आतल्या खोलीत घेऊन जायचे. नोकरीला लावणार का असं विचारायचे. शब्द दिला तरच लग्न जुळायचं, नाही तर लग्न जुळत नाही. या सामाजिक परिस्थितीचं भान राज्यकर्त्यांना आलं असेल असं वाटत नाही. त्यामुळे जरांगे पाटलांची फसवाफसवी थांबवा, नाही तर सरकारवरच उलटेल, असा इशारा प्रकाश आंबेडकर यांनी दिला आहे.

---

# टायर फुटला अन् शिवशाहीने पेट घेतला

## संपूर्ण बस जळून खाक

**✔ सुराज्य/बीड**



बीडच्या परळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एसटी महामंडळाच्या शिवशाही बसला भीषण आग लागली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी संपूर्ण बस जळून खाक झाली आहे. लातूरहून परभणीकडे जाणारी ही बस परळी शहरात दाखल होताच छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहोचली आणि यावेळी बसचे टायर फुटले आणि बसला भीषण आग लागली. या एसटीमध्ये एकूण सहा प्रवासी प्रवास करीत होते. मात्र, एसटी चालकाच्या प्रसंगावधानाने वेळीच पुढील अनर्थ टळला आहे.

लातूरहून परळीकडे निघालेल्या शिवशाही बसने परळीपर्यंतचा प्रवास हा आरामात केला. मात्र, परळीतील छत्रपती शिवाजी महाराज चौकात येतात काहीतरी वाजल्याचा आवाज मोठा झाला. मात्र, यावेळेस या शिवशाहीच्या चालकाला आपल्याच गाडीच्या टायरचा हा आवाज असल्याचं जाणवलं. यावेळेस तात्काळ त्यांनी गाडी साईडला करत गाडीचा अंदाज घेतला, त्यावेळेस गाडीचा टायर फुटल्याचं त्यांच्या लक्षात आलं. त्यानंतर या गाडीच्या टायरने पेट घेतला. मात्र, गाडीने पेट घेताच काही क्षणात पेट वाढत चालल्याने चालकाच्या समय सूचकतेमुळे या गाडीतील प्रवासी हे सुखरूप बाहेर पडले.

---

# घटनादुरुस्तीद्वारे नवमुस्लिमांना न्याय द्यावा...

ज्यांनी ज्यांनी धर्म बदलला. धर्मांतर केले. त्यांची पूर्वीची जातच दुसऱ्या धर्मातील त्यांची ओळख बनली. शासन स्थापित विविध आयोग, समिती, कमिशन, संशोधन कमेट्यांनी आपल्या संशोधनातून हे पुढे आणले आहे. पूर्वाश्रमीचा हिंदू खाटीकच मुस्लीम खाटीक - कसाई झाल्याचे यांनीच ठासून सांगितले आहे . मग धर्मांतरीत महार बांधवांना बौद्ध झाल्यानंतर नवबौद्ध म्हणून एस. सी. ची सवलत देण्यासाठी जशी घटना दुरुस्ती केली गेली तोच न्याय धर्मांतरीत मुस्लीम खाटीक, मुस्लीम मागासांना घटना दुरुस्ती करून दिला जावा. हेच न्यायाचे ठरणार आहे. मुस्लीम खाटीक, कसाई यांच्या मागासले पणाचा आणि पूर्वी ते हिंदू खाटीक, दलितच होते याची स्पष्टता त्यांच्या आडनावावरून आजही येते आहे. जी आडनावे पिढ्यानपिढ्या आम्ही तशीच जपली आहेत. आम्हां मुस्लीम खाटीकांमध्ये असलेली, कांबळे, आदमाने, कोथमिरे, खडके, भातनावे, घोडके, शहाजी, सव्वालाखे, जाधव, सदावर्ते, धारूरकर, चोरभोर, राशनकर, धाकपाडे, क्षीरसागर, गोट्याकर, गाडीवान, विजापूरे, रहिमतपूरे, माडी, कल्याणकर, पलंगे, बेंद्रे, बेदरेकर, भैलुनकर, भडाळे, भंडारे, करमाळकर, पन्हाळकर, साठी, पालकर, ताडे, चवधरी, घोणे, गुणे, सदाबडे, बांगर, मस्के, परांडे, नाडेवाले, जानवेकर, कलाल, खाटीक ही आडनावे पाहिल्यास ते पूर्वाश्रमीचे हिंदू खाटीक, दलित होते, हे सिध्द करण्यासाठी मदतच करतील. ज्या मुस्लीम खाटीक बांधवांच्या पूर्वजांच्या आडनावात वरील आडनावे आढळत आहेत अशा मुस्लीम खाटीक बांधवांना एससी आरक्षणासाठी प्रथम प्राधान्याने न्याय देण्याचे काम व्हावे. १९६७ पूर्वीचा आडनावांचा-व्यवसायाचा असा पुरावा ग्राह्य धरला जावा.

मराठा आणि धनगर समाज तसेच देशातील इतर मागासांना आरक्षण, शक्ती, पाठबळ देण्याचे प्रयत्न सुरु आहेत. त्याविषयी आम्हांला आस्था व आपुलकी आहेच. त्या सर्वांना त्यांच्या संख्येला अनुरूप आणि त्यांना अभिप्रेत असणारे असणारे आरक्षण दिले गेलेच पाहिजे. या मताचेच आम्ही आहोत. देशात मुस्लीम मागासांना अद्याप नेतृत्वच नाही. त्यात ही मुस्लीम खाटीक समाज तर एका अडगळीच्या, सांदाडीच्या कोपऱ्यात फेकला गेला आहे.

मुस्लीम खाटीक बांधवांसाठीचे वेगळे कबरस्थान, वेगळ्या मशिदी शेकडो गावात आढळून येतील. मात्र, हिंदू खाटीक बांधवांसाठीचे वेगळे मंदिर, वेगळी स्मशानभूमी देशात कुठेही आढळून येणार नाही. सामाजिक विषमतेचे, दाहकतेचे चटके, आजही मुस्लीम खाटीक बांधव पदोपदी अनुभवतात. शिवचरित्रामध्ये मालोजी राजांना गुरूपदेश देणारे श्रीगोंद्याचे बाबा महंमद यांचा उल्लेख ते खाटीक असल्याचा केला गेला आहे. असे काही सन्माननीय अपवाद वगळता, आज राज्यातल्या, देशातल्या लाखो मुस्लीम खाटीक बांधवांची चौफेर होरपळ सुरू असताना शासनकर्त्यांनी, जबाबदार सत्ताधारी आणि विरोधी लोकप्रतिनिधींनी श्री. विठ्ठलांच्या- श्री. पांडुरंगाच्या भूमिकेतून मुस्लीम खाटीक बांधवांच्या मदतीला धावावे. बिहार आणि झारखंड सरकारने दलित मुस्लिमांना एससी आरक्षणाची सवलत मिळावी म्हणून २००० साली राज्याचा प्रस्ताव संमत करून केंद्र सरकारकडे पाठविला आहे. तशा प्रकारची पुष्टी देणारा मुस्लीम खाटीक आणि मुस्लीम मागासांच्या एससी आरक्षणातील समावेशासाठी घटना दुरुस्तीसाठीचा प्रस्ताव राज्य सरकारने केंद्राकडे पाठवून श्री. पांडुरंगाचे आशीर्वाद स्वत:ही घ्यावेत आणि मुस्लीम खाटीक बांधवांना ही मिळावेत, यासाठी तातडीने कृतीशील पावले टाकावीत हीच आग्रही अपेक्षा आहे. राज्य सरकार असा प्रस्ताव मंजूर करून देशाला दिशा देण्याचे काम करेल, असे मनोमन वाटते.

**मुस्लीम खाटीक समाजाची राजकीय क्षेत्रातील अवस्था पहावी तर हे क्षेत्र जणू त्यांच्यासाठी नसावेच अशी एकंदर स्थिती आहे. शेतीवाडी, गुरं ढोरं आणि संपन्नता याबाबत तर मुस्लीम खाटीक बांधवांची स्थिती 'ढुंढते रह जाओगे' अशी झाली आहे. या समाजाला नेतृत्व देऊन मुस्लीम खाटीक समाजाचा एस. सी. त (अनुसूचित जाती) समावेश करण्यासाठी संसद आणि विधीमंडळातील लोकप्रतिनिधींनी मुस्लीम मागासांचे नेतृत्व आणि शक्ती बनावे, असे माझ्या सारख्याला नम्रपणे वाटते. शेकडो मुस्लीम खाटीक बांधवांमध्ये 'खाटीक' आडनाव सापडून येते. मात्र, हिंदू खाटीक बांधवांत 'खाटीक' आडनाव शोधूनही सापडणार नाही. 'खाटीक' यांच्या साठी असलेल्या एससीच्या आरक्षणासाठी आडनाव खाटीक नसलेले हिंदू खाटीक मात्र पात्र आणि आडनाव खाटीक असणारे मुस्लीम खाटीक मात्र एससीच्या आरक्षणासाठी अपात्र. हे न्यायाचे आहे का? हे अभ्यासले गेले पाहिजे.**

जगातला इस्लाम आणि भारतातला मुसलमान यामध्ये जमीन आस्मानाचा फरक आहे. जगातल्या मुस्लीमांमध्ये जात, पात, वर्ण, भेद, पाळले जात नसल्याचे सांगितले जाते. मात्र, भारतीय मुस्लीमांमध्ये जात, पात, वर्ण, भेद, वगैरे आजही कायम आहेत. या वास्तवाला धरून अनेक महत्वपूर्ण मागण्यांवर सरकारचे लक्ष वेधत आहे. १) नवबौद्ध बांधवांप्रमाणे धर्मांतरीत मुस्लीम खाटीक व इतर मुस्लीम मागासांना नवमुस्लीम म्हणून अनुसुचित जाती आरक्षणाची सवलत मिळावी. त्यासाठी तातडीने घटनादुरुस्ती केली जावी. २) अनुसुचित जाती आरक्षण जागांची क्षमता ७ टक्क्यांनी वाढवून या वाढीव जागा नवमुस्लीमांसाठी राखीव केल्या जाव्यात, त्यासाठीही घटनादुरुस्तीद्वारे मान्यता द्यावी.



३) मुस्लिमांच्या जन्म, शाळा दाखल्यामध्ये जातीची नोंद केली जात नाही. यामुळे जात पडताळणी करताना मुस्लीम मागासांची मोठी ससेहोलपट केली जाते. त्यांना हतबल केले जाते. आर्थिक शोषण केले जाते, हे त्वरीत थांबले पाहिजे. ४) परिवारातल्या एखाद्याची पूर्वी जात पडताळणी झाली असल्यास, त्या परिवारातल्या सर्वांना न मागता जात पडताळणी प्रमाणपत्रे देण्याचा धोरणात्मक निर्णय राज्य-केंद्र सरकारकडून केला जावा. ५) भावकी, बुडक्यातल्या, नात्यातल्या, जात पडताळणी प्रमाणपत्र संपादन केलेल्या बांधवांने, त्याच्या जातप्रमाण पत्राच्या सत्यतेसह केलेली शिफारस, मुख्य पुरावा मानून जात पडताळणी प्रमाणपत्राची मागणी करणाऱ्या मुस्लीम मागासांना महिनाभराच्या आत जात पडताळणी प्रमाणपत्रे देण्याबाबत राज्य-केंद्र सरकारने नवे धोरण स्विकारावे. ६) राज्यातल्या मुस्लिमांना तत्कालीन आघाडी सरकारने दिलेले ५ टक्के आरक्षण राज्य सरकारने तातडीने अंमलात आणावे. ७) जोपर्यंत एससी आरक्षण दिले जात नाही, तोपर्यंत, मुस्लीम खाटीक, मुस्लीम मागासांचा समावेश एसटीच्या (अनुसूचित जमाती) आरक्षणामध्ये करावा. या मुस्लीम मागासांच्या मुला-मुलींच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, विशेष सवलती सुरु कराव्यात. ८) मुस्लीम खाटीक कुटुंबांना १०० टक्के अनुदानावर घरकुले मंजूर केली जावीत. ९) मुस्लीम खाटीक परिवारातल्या सर्वांचे शासनाच्यावतीने सक्तीने विमा उतरविला जावा. १०) मटन विक्रीच्या व्यवसायासाठी सहज परवाना मिळेल, असे राज्यभरात एकच धोरण आखले जावे. ११) राज्यातल्या सर्व बाजार समित्यात बोकडे व लहान जनावरे खरेदीसाठी राज्यभरात एकच परवाना असावा. प्रत्येक बाजार समितीत वेगळा परवाना, वेगळी फी या ऐवजी एकसारखी रक्कम वर्षातून एकदाच, एकाच ठिकाणी भरून घेतली जावी आणि या लायसेन्सचा उपयोग राज्यभर व्हावा. १२) गुडस् कॅरीअर म्हणून जनावर वाहतुकीसाठी अपे, जीप, टेम्पो, ट्रक्स व अन्य वाहनांचा परवाना तसेच जनावर वाहतुकीसाठी जनावरांची संख्या, वजन आणि वाहनांना विशिष्ट रंग, याबाबतचे नवे धोरण सर्वत्र अंमलात आणावे.

**(उत्तरार्ध)**
**- सादीक खाटीक.**

## संक्षिप्त वृत्त...

### वैराग येथील संतनाथ साखर कारखान्यात चोरी; १८ लाखाचा माल जप्त; दोघांना पोलीस कोठडी

**सोलापूर** : बंद असलेल्या साखर कारखान्याच्या पाठीमागील गेटमधून प्रवेश करून ९ लाख ५० हजाराची यंत्रसामुग्री चोरून नेताना वैरागच्या पोलिसांनी दोघांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून टेंपोसह १७ लाख ९० हजाराचा माल जप्त केला. ही चोरींची घटना वैराग (ता.बार्शी) येथील संतनाथ साखर कारखान्यात काल शुक्रवारी पहाटेच्या सुमारास उघडकिस आली.अटकेतील दोघांना न्यायालयाने ३ दिवसाची पोलीस कोठडी आज शनिवारी सुनावली.वैराग येथील तुळशीदास नगर येथे संतनाथ साखर कारखाना असून तो बंद अवस्थेत आहे. काल शुक्रवारी रात्रीच्या सुमारास युवराज प्रकाश प्रबळकर (वय २७) आदित्य संदीप पवार, आणि वाहन चालक फयाज युसूफ उर्फ इब्राहिम अन्सार (वय २१ सर्व रा.वैराग ता.बार्शी) या तिघांनी मिळून कारखान्याच्या पाठीमागील गेटमधून प्रवेश केला. आणि एमएच१३- डीक्यू- ५१७३ या पिकअप वाहनात ५ नग इंडक्शन मोटारी, इलेक्ट्रिक मोटर आणि इतर लोखंडी साहित्य असा ९ लाख ५० हजाराचा माल चोरून निघत होते. याची माहिती मिळाल्यानंतर वैरागच्या पोलिसांनी मध्यरात्री घटनास्थळी जाऊन पाहणी केली. त्यावेळी आदित्य पवार हा पोलिसांना पाहून पसार झाला. पोलिसांनी दोघांना अटक करून वाहनासह एकूण १७ लाख ९० हजार रुपये किमतींचा माल जप्त केला. या चोरींची फिर्याद पोलीस शिपाई पंडित गवळी यांनी वैराग पोलिसात दाखल केली आहे. पुढील तपास हवालदार आलाट करीत आहेत.

### रिक्षाचा रेस का वाढवतो असे विचारल्याने महिलेस मारहाण

**सोलापूर** : घरासमोर रिक्षाचा रेस का वाढवतो अशी विचारणा करणाऱ्या महिलेस शेजारी राहणाऱ्या रिक्षा ड्रायव्हरने मारहाण केली. तसेच फिर्यादी व फिर्यादीच्या आईस शिवीगाळ करून मारहाण केली.याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात पोलीस ठाण्यात रिक्षा चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. घटनेची हकिकत अशी की,फिर्यादी भाग्यवान विष्णू खंदारे (रा.प्रभाकर महाराज मंदिर जवळ,सोलापूर) हे घरासमोर बसले असताना आरोपी रिक्षाचालक भोलेनाथ सिद्राम सकट (रा.बुधवार पेठ,जवळकर वस्ती,सोलापूर) हा घरासमोर रस्त्यावर जोरजोराने रिक्षाचे रेस वाढवून आवाज करत होता.घराशेजारी राहणारी कमलाबाई हिने रिक्षाची रेस का वाढतो असे समजावून सांगत असताना आरोपींने शिवीगाळ करत जवळच पडलेले लाकूड हातात घेऊन व महिलेस मारहाण केली.फिर्यादी व महिलेस डाव्या खांद्याला मोठी गंभीर जखम केली.भांडण सोडण्यासाठी आलेली आई गंगाबाई हिला देखील मारहाण केली.घटनेचा अधिक तपास पोलीस कॉन्स्टेबल जमादार करत आहेत.

### पोलिसात दिलेल्या तक्रारीचा राग मनात धरून युवकास मारहाण

**सोलापूर** : पोलिसाकडे केलेल्या तक्रारींचा राग मनात धरून एका युवकास बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना शामा नगर सोलापूर येथे घडली. घटनेची हकींकत अशी की,फिर्यादी कृष्णा रामचंद्र कोळी (वय-२३) हा त्याचा मित्र सागर कोळी याच्याबरोबर चहा पिऊन घरी जात असताना संशयित आरोपी अजय रघुनाथ जाधव (रा.शामा नगर,सात रस्ता,सोलापूर) याने फिर्यादीस रस्त्यात आडवून पोलिसांकडे दिलेल्या तक्रारींचा राग मनात धरून शिवीगाळ करून दगडाने मारहाण केली.तसेच अंगठ्यास जोराने चावून जखमी केले.सदर बझार पोलीस ठाण्यात पोलीस ठाण्यात आरोपींचे विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.अधिक तपास पोलीस नाईक माडे हे करत आहेत.

### मानेवाडी येथे जावयास मारहाण; सासऱ्यासह चौघांविरुद्ध गुन्हा

**सोलापूर** : मुलाला भेटण्यासाठी सासरी आलेल्या जावयाला काठी, दगड आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना मानेवाडी (ता. सांगोला) येथे गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात मंगळवेढाच्या पोलिसांनी जावयाचे सासरे पत्नी आणि मेहुण्याविरुद्ध गुन्हा दाखल केला . यासंदर्भात दत्तात्रय तातोबा सरगर (वय ३० रा.घेरडी ता.सांगोला) या जावयाने मंगळवेढा पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी विठ्ठल शिवाजी वाघमोडे (सासरे), दोन मेहुणे राजेंद्र वाघमोडे, वाघमोडे आणि पत्नी अर्चना सरगर (सर्व रा.हणार मानेवाडी) या चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. दत्तात्रय सरगर याची पत्नी अर्चना ही काही दिवसापासून माहेरी राहण्यास आहे. दत्तात्रय सरगर हा गुरुवारी सकाळी पत्नी आणि मुलाला भेटण्यासाठी मानेवाडी येथील सासऱ्याच्या शेतात गेला होता. त्यावेळी वरील चौघांनी मिळून त्याला मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार काळे पुढील तपासकरींत आहेत.

### चिखर्डे येथे घरफोडी; रोख रकमेसह सव्वा लाखाचे दागिने गायब

**पांगरी** : घरा पाठीमागील भिंतीवरून प्रवेश करून चोरट्याने कपाटातील रोख रकमेसह १लाख २५ हजाराचे दागिने पळविले. ही चोरी चिखर्डे (ता.बार्शी) येथे काल शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडली. यासंदर्भात शिवाजी विठ्ठल क्षीरसागर (रा. चिखर्डे) यांनी पांगरी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. चोरट्याने घराच्या पाठीमागील भिंतीवरून जिन्यात प्रवेश केला. त्यानंतर हॉलमध्ये प्रवेश करून कपाटातील १० हजार रुपये रोख आणि ३० ग्रॅम सोन्याचे दागिने चोरून नेले. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे .पुढील तपास फौजदार जाधव करीत आहेत.

### पिलीव येथे शटर तोडून ६८ हजाराचे साहित्य पळविले

**माळशिरस** : तालुक्यातील पिलीव येथे स्वामी समर्थ मशिनरी या बंद दुकानाच्या शटरचे कुलूप तोडून चोरट्याने ६८ हजार रुपये किमतींचे शेती उपयोगी साहित्य पळविले ही चोरी. शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडली. यासंदर्भात दुकानाचे चालक ओंकार राजेंद्र आंधळकर (रा. पिलीव) यांनी माळशिरस पोलिसात फिर्याद दाखल केली. ती गुरुवारी रात्री नेहमीप्रमाणे दुकान बंद करून घरी गेले होते. सकाळी परतल्यानंतर त्यांना शटरचे कुलूप तुटलेले दिसले. आत जाऊन पाहणी केली असता तांब्याची वायर, इलेक्ट्रिक स्टार्टर, डीव्हीआर आणि इतर शेती उपयोगी साहित्य चोरीस गेल्याचे आढळले. पूढील तपास हवालदार झगडे करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



माझ्या प्लॅनिंगने त्यांना घाम फुटतो !

कल्याण
566-72-237

# उजनीतून कालव्यात सोडलेले पाणी केले बंद

## करकंबचा टँक, आष्टी तलाव घेतले भरून; ०.९० टीमसी गेले पाणी

**सुराज्य/टेंभुर्णी**



उजनी धरणाच्या मुख्य कालव्यातून दि. १७ ऑक्टोबर रोजी सकाळपासून १ हजार ५०० क्युसेक्स विसर्गाने पाणी सोडलेले शनिवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी सकाळी बंद करण्यात आले. या पाण्यातून करकंब येथील पाण्याचा टँक व आष्टी तलाव भरून घेण्यात आला आहे.

दि. १ नोव्हेंबर २०२३ पासून मुख्य कालवा, उजवा, डावा कालवा, भीमा - सीना जोड कालवा (बोगदा ) यामधून शेतीसाठी पाण्याचे आवर्तन सुरू करण्यात येणार की नाही? हे दि. २७ ऑक्टोबर रोजीच्या होणाऱ्या बैठकीत ठरणार आहे.

दि. १५ ऑक्टोबर हा सरकारी पावसाळा संपलेला अखेरचा दिवस असतो. २०२३ या वर्षात सर्वत्र पाऊस कमी झाला. त्याचप्रमाणे उजनी धरणाच्या वरील भागातदेखील कमीअधिक प्रमाणात पाऊस झाल्यामुळे उजनीचे वरील १९ धरणे १०० टक्के भरली असली तरी उजनी धरण जलाशयामध्ये आज ५८.६० टक्के पाणी व ९५ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे.

### धरणातून १५०० क्युसेक्सने सोडले पाणी..

करकंब परिसर, आष्टी, आठ गाव, अनेक वाड्यावर पिण्यासाठी पाण्याचे प्रचंड हाल सुरू होते. अनेक ठिकाणी पाण्याच्या टँकरची मागणी होत आहे. कालव्यातून पाणी सोडण्याची मागणी अनेक दिवसांपासून होत आहे. यासाठी मंगळवार, दि. १७ ऑक्टोबर सकाळपासून पिण्यासाठी करकंब, आष्टी तलाव भरून घेण्यासाठी १५०० क्युसेक्सने मुख्य कालव्यातून पाणी सोडले होते. ते पाणी चार दिवस चालू होते. या दिवसात उजनी १.८८% कमी झाली आहे.



## न्यासाच्या प्रांगणात रंगला भोंडला कार्यक्रम

**सुराज्य/अक्कलकोट**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ यांची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने हिरकणी सखी मंचकडून दुर्गा अष्टमीनिमित्त न्यासाच्या प्रांगणात भोंडला कार्यक्रम मोठ्या साजरा करण्यात आला.

श्री स्वामी समर्थ, श्री अन्नपूर्णा माता आणि आई तुळजाभवानी मातेच्या प्रतिमेसह हत्तीच्या मूर्तीचे पूजन न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी व संजय कुलकर्णी यांच्या मंत्रपठाणाने आणि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी मल्लम्मा पसारे, डॉ.अशावरी पेडगावकर, लता मोरे, रुपाली शहा, डॉ.पवित्रा मलगोंडा, संगिता राठोड, जया सुरवसे, केतकी नकाते, रुपाली रामदासी, आशा भगरे, प्रीती रणसुभे, अध्यक्षा अलकाताई भोसले, उपाध्यक्षा रत्नमाला मचाले, सचिवा अर्पिताराजे भोसले, तेजुराजे भोसले, स्वामिनीराजे भोसले, खजिनदार स्मिता कदम, अनिता खोबरे, संगिता भोसले, उज्ज्वला भोसले, पल्लवी कदम, अंबुताई पवार, पल्लवी नवले, स्वाती निकम, छाया पवार, राजश्री माने, क्रांती वाकडे, कविता वाकडे, शिला मचाले, साधना मचाले, ज्योती मोरे, सुषमा माने, प्रीति रणसुभे, निता सुर्यवंशी, शुभांगी घाडगे, सचिता पाटील, सोनाली पाटील, निर्मला साठे, रुपाली पवार, प्रमोदिनी सुर्यवंशी, शोभा पोळ, सुवर्णा घाडगे, तृप्ती बाबर, प्रेरणा पाटील, मीनल शहा, राजश्री कलशेट्टी, सुनंदा अष्टगी आदी महिला भगिनी उपस्थित होत्या.

अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले, मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व संस्थाध्यक्षा अलकाताई भोसले यांच्या नेतृत्वाखाली हा भोंडल्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

### मंगळवेढा येथे अपघात; तरुणाचा मृत्यू

**सुराज्य/मंगळवेढा**

मंगळवेढा येथे बैलगाडीला पाठीमागून धडक दिल्याने दुचाकीवरील तरुणाचा मृत्यू झाला. आदित्य रामचंद्र राठोड (वय-२०, बालाजीनगर, मंगळवेढा) असे मरण पावलेल्या तरुणाचे नाव आहे. मंगळवेढा येथील सुगरण हॉटेलजवळ ही दुर्घटना घडली.

आदित्य हा सोलापुरातून मंगळवेढ्याकडे मोटारसायकवरून निघाला होता. हॉटेल सुगरण येथे समोरून जाणाऱ्या बैलगाडीला त्याच्या दुचाकीने पाठीमागून धडक दिली. त्यामध्ये त्याच्या डोक्याला मुका मार लागला. त्यानंतर तो बेशुद्ध झाल्याने त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारापूर्वी त्याचा मृत्यू झाला. याची प्राथमिक नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## पांडुरंग कारखान्याचे सभासद, शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी मोठे योगदान: शिरीष सरदेशपांडे

### कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक कारखान्याचा बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा

**सुराज्य/सोलापूर**




शेतकरी, कामगार, व्यापारी, सरका, बँका आदी सर्व घटकांची देणी वेळेवर देणारा कर्मयोगी पांडुरंग कारखाना सहकारासाठी आदर्शवत आहे. सहकारात हे चित्र सर्वत्र राहिले तर सहकाराला आणखी नावलौकिक प्राप्त होईल, असे मत सोलापूर जिल्हा पोलीस प्रमुख शिरीष सरदेशपांडे यांनी व्यक्त केले. श्रीपुर येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक साखर कारखान्याच्यागळीत हंगामाच्या बॉयलर अग्नी प्रदीपन समारंभात ते बोलत होते.

पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशमुख व कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या हस्ते कारखान्याचा बॉयलर अग्नी प्रदीपन झाला. यावेळी उपाध्यक्ष कैलास खुळे, कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी उपस्थित होते.

यावेळी बोलताना अध्यक्ष प्रशांत परिचारक म्हणाले की, कारखाना यावर्षीही थेट उसाच्या रसापासून इथेनॉल बनवणार आहे. मॉलिसीसपासून बनवलेल्या इथेनॉलपेक्षा रसापासून बनवलेल्या इथेनॉलला पाच ते सात रुपये जास्तीचा दर मिळत आहे. यामधील राहिलेला १५१ रुपयांचा हप्ता आजच ऊस उत्पादकांच्या नावे वर्ग केला आहे. यावेळी दीनकरराव मोरे, वसंतराव देशमुख, दिलीप चव्हाण, बाळासाहेब सालविठ्ठल, हरीश गायकवाड, दाजी पाटील, संतोष मुळे, उमेश विरदे, राजू गावडे, प्रशांत देशमुख, आबासाहेब फडतरे, शशिकांत गरड उपस्थित होते. आभार प्रदर्शन व्हाईस चेअरमन कैलासराव खुळे यांन, सूत्रसंचालन डॉ . सुधीर पोफळे यांनी केले.

### अक्कलकोटमध्ये तरुणास मारहाण

**अक्कलकोट** : अक्कलकोट येथील टिळक नगरात राहणाऱ्या मनोहर रमेश माने (वय- २८) या तरुणास भाजी मंडईमध्ये अज्ञात कारणावरून अज्ञात व्यक्तींने काठी, दगडाने मारहाण केली. त्याच्यावर अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर त्याला पुढील उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## अहवाल येताच अक्कलकोटचा दुष्काळ यादीत समावेश

### आ.सचिन कल्याणशेट्टी यांची माहिती

**अक्कलकोट** : अक्कलकोट तालुका दुष्काळ यादींत नसल्याची चर्चा करणे निरर्थक आहे. दुसऱ्या टप्प्यात समावेश असणार आहे. त्याचे काम दि.२१ ऑक्टोबरपासून सुरू झाले आहे. येत्या चार दिवसात कृषी विभागाकडून अहवाल येताच यादीत समाविष्ट होईल, अशी माहिती आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी पत्रकार परिषदेत दिली.




आ. कल्याणशेट्टी म्हणाले, विविध वृत्तपत्रातून अक्कलकोट तालुका दुष्काळी यादींत नसल्याच्या बातम्या येत आहेत. त्यात काही तथ्य नाही. विविध प्रकारचे निकष लावून दुष्काळ यादींत समाविष्ट केले जाते. एका सिस्टीममधून अहवाल शासनाला जातो. पहिला, दुसरा, तिसरा असे तीन टप्प्यात अहवाल सादर केला जातो. नुकताच जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिले असून कृषी विभागाने शनिवारपासून कामाला सुरुवात केली आहे. यासाठी सॅटेलाईटद्वारे अहवाल घेतले जाते. तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती भयानक आहे. टेक्निकल अडचणींमुळे पहिल्या टप्प्यात झाले नाही. लवकरच चार दिवसात होईल. कोणीही घाबरण्याचे कारण नाही.






## संक्षिप्त वृत्त...



### शिक्षणमंत्री केसरकर यांनी घेतले स्वामी समर्थांचे दर्शन

**अक्कलकोट** : स्वामी भक्तीतच समाधानी जीवनाचे राजमार्ग असल्याचे व आध्यात्मिक व धार्मिक क्षेत्रात वटवृक्ष देवस्थानचे कार्य खुप महान असल्याचे मनोगत राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्यावतीने त्यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला. त्यावेळी केसरकर बोलत होते. यावेळी श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, संजय पवार, सचिन हन्नूरे, भिमा मिनगले, श्रीकांत मलवे, प्रसाद सोनार, सागर गोंडाळ उपस्थित होते.



### मोटार सायकल चोरट्यास मोहोळ पोलिसांनी पकडले

**विरवडे बुद्रुक** : मोहोळ तालुक्यातील कुरूल ते अंकोली रस्त्यालगत मोटार सायकल चोरास पोलिसांनी अटक केली आहे. सदरच्या रस्त्यावरील माळावरील झुडपात कांही इसम हे मोटारसायकल सहीत थांबलेले असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली. त्यांच्याकडे कुरूल येथून चोरील गेलेल्या मोटार सायकली असल्याची माहिती मिळताच डी.बी. पथकाने नामदेव बबन चुनाडे (अनिलनगर, पंढरपूर) याला पकडले. दुसरा आरोपी वैजिनाथ प्रल्हाद खांडेकर (वय-२५ वर्षे, अनिलनगर) हा पळून गेला. या छाप्यात पोलिसांनी अडीच लाख रुपये किंमतीच्या चार मोटारसायकली जप्त केल्या. सध्या वैजिनाथ खांडेकर हा पोलीस कस्टडी रिमांडमध्ये आहे. तपास सहा.पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव बोबडे करीत आहेत. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक हिंम्मत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली.

### कवी कटकधोंड यांच्या 'डोहतळ'ला 'शांता शेळके' साहित्य पुरस्कार

**सोलापूर** : सोलापूरचे ज्येष्ठ कवी मारुती कटकधोंड यांच्या 'डोहतळ' या काव्यसंग्रहाची शांता शेळके साहित्य पुरस्कारासाठी निवड केल्याची माहिती कवयित्री शांता शेळके प्रतिष्ठानचे अध्यक्ष दत्ता पायमोडे यांनी दिली. पुरस्काराचे वितरण डिसेंबर २०२३ मध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. कवयित्री शांता शेळके प्रतिष्ठान मंचर, पुण्याच्यावतीने ही निवड केली आहे. सोलापूर महाराष्ट्र परिषदेचे उपाध्यक्ष व उद्योजक दत्ता सुरवसे, मसाप शाखा जुळे सोलापूरचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, मसाप शाखेचे अध्यक्ष प्रा.डॉ.श्रुती वडगबाळकर, हिराचंद नेमचंद वाचनालयाचे प्रमुख कार्यवाह डॉ.श्रीकांत येळेगावकर, साहित्यिक योगीराज वाघमारे, राजेंद्र दास, ज्येष्ठ कवी माधव पवार, राजेंद्र भोसले, गिरीश दुनाखे, बदीउज्जमा बिराजदार यांनी अभिनंदन केले आहे.





### श्रीराम स्कूलचे रायफल शुटिंग स्पर्धेत यश

**सोलापूर** : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित डी.आर. श्रीराम इंग्लिश स्कूलचे वेटलिफ्टिंग आणि एअर रायफल शुटींग स्पर्धेत यश संपादन केले. शालेय १४ व १७ वर्षाखालील वयोगटात ही कामगिरी केली. यामध्ये वरुण बाबर, वेदांत ताटी, अफान शेख, जैद शेख, गिरीष सामलेटी, सुजल चव्हाण यांनी यश मिळवले. त्यांना क्रीडाशिक्षक जिशान शेख, नबीलाल पटेल यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापिका अजिता पिल्लाई, उपमुख्याध्यापक पुजारी, काशिनाथ गड्डम, श्रीनिवास कोंडी, दशरथ गोप, संगीता इंदापुरे, नागनाथ गंजी, श्रीधर चिट्याल यांनी अभिनंदन केले.

### फवारणीनंतर माळकवठे येथील शेतकऱ्याची पपई बाग करपली

**सोलापूर** : माळकवठे (ता.दक्षिण सोलापूर) येथील शेतकरी उमेश वाघमारे यांनी साडेचार एकरामध्ये पपईची लागवड केली होती. फळाची बाग वाढ व्हावी, फुले गळू नये, यासाठी त्यांनी मंद्रूप येथील बिराजदार कृषी केंद्रातून औषधे आणून फवारणी केले असता संपूर्ण पपई बाग करपली. त्यामुळे त्यांचे नुकसान झाले आहे. त्यांनी नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. त्या औषधांमुळे फुले, फळे, पाला आदी गळाली आहेत. संपूर्ण बागच उध्दवस्थ झालेली आहे. याची तक्रार संबंधित कृषी केंद्र चालकांकडे केली. मात्र दखल घेतली नाही. नाईलाजास्तव जिल्हा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केली आहे. तातडीने न्याय देण्यात यावा, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कुटुंबासह उपोषणास बसणार असल्याचा वाघमारे यांनी दिला आहे.

### जे.बी. फाऊंडेशनतर्फे आज सामुदायिक विवाह

**सोलापूर** : वाहीदभाई बिजापुरे आणि जे.बी. फाऊंडेशनच्यावतीने रविवार, दि.२२ ऑक्टोबर रोजी अचिव्हर्स फंक्शन हॉल नं.२ पोलीस मुख्यालयासमोर सामुदायिक विवाह सोहळा आयोजित केला आहे. या सोहळ्यात ७ जोडप्यांचा विवाह होणार आहे. वधू-वरांना लागणारे जीवनावश्यक व संसारोपयोगी वस्तू, साहित्य, कपाट, पलंग व त्यांच्या १०० नातेवाईकांना जेवणाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

# मोहोळ तालुक्यात उच्चांकी दर देण्याची परंपरा 'जकराया'कडून कायम

## दिवाळीसाठी पन्नास रुपयांचा हप्ता; ॲड. जाधव यांची घोषणा



**सुराज्य/विरवडे बु.**

मोहोळ तालुक्यातील वटवटे येथील जकराया साखर कारखाना यंदाच्या गळीत हंगामातही जिल्ह्यातील उच्चांकी दर देण्यास वचनबद्ध असल्याची ग्वाही देत गेल्या वर्षीच्या गळीत हंगामात गाळपास आलेल्या उसाला दिवाळी सणासाठी प्रतिटन पन्नास रुपये देण्याची घोषणा कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष ॲड.बी.बी.जाधव यांनी केली आहे.

जकराया साखर कारखान्याच्या तेराव्या गळीत हंगामाचा शुभारंभ व बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा कारखाना स्थळावर झाला. त्यावेळी जाधव बोलत होते.

यावेळी पांडुरंग आवाड, बाबासाहेब क्षीरसागर, सचिन जाधव, राहुल जाधव, सुलेमान तांबोळी, डॉ. बाळासाहेब सरवळे, श्रीधर माने, नानासाहेब बाबर उपस्थित होते.

कारखान्याचे सभासद डॉ. विष्णू गोडसे व त्यांच्या पत्नीराधाताई गोडसे आणि राहुल जाधव व प्रियांका जाधव यांच्या हस्ते विधिवत पूजा करून कारखान्याच्या बॉयलरचा अग्नी प्रदीपन व गाळप हंगाम शुभारंभ करण्यात आला.

सन २०२२-२३ सालच्या गळीत हंगामासाठी साखर कारखान्याची यंत्रणा सज्ज झाली असून यासाठी दोनशे ट्रॅक्टर, तीनशे बैलगाडी आणि दीडशे डपींग ट्रॅक्टरचे करार करण्यात आले असल्याचे कार्यकारी संचालक सचिन जाधव यांनी सांगितले.

यावेळी रामचंद्र पतंगे, बाळासाहेब टेळे, जयंत पवार, लक्ष्मण माने, रफिक पाटील, तानाजी जाधव, एकनाथ वाघमारे, चंद्रकांत सरवळे, भानुदास गावडे, नामदेव गायकवाड, प्रभाकर पाटील, सिद्धेश्वर मोरे, नंदकुमार आतकरे, औदुंबर गायकवाड, रघुनाथ होनराव, अनिल वाघमारे, प्रवीण गोडसे, यशवंत कोकाटे, आनंद पाटील, युवराज महाडकर, अरुण घुले उपस्थित होते.

सूत्रसंचालन विजय महाजन यांनी केले.

### उत्कृष्ट कार्यकारी संचालक

गेल्या वर्षीच्या गळीत हंगामात काटेकोर नियोजन करून सर्व शेतकऱ्यांचा ऊस वेळेत गाळपास आणून सालाबादप्रमाणे यंदाही मोहोळ तालुक्यातील इतर कारखाण्यापेक्षा उच्चांकी दर देण्याची परंपरा कायम राखला. याबद्दल कारखान्याचा सर्व ऊस पुरवठादार शेतकऱ्यांनी सचिन जाधव यांना उत्कृष्ट कार्यकारी संचालक म्हणून शेतकरी प्रतिनिधी चंद्रकांत सरवळे यांच्या हस्ते सत्कार करून गौरविले.

# ऐंशीनंतर पेन्शनसाठी टेन्शन नको

## शाळा सोडल्याच्या दाखल्याची मागणी करू नये; सोलापूर जिल्हा सेवानिवृत्त शिक्षक संघाची मागणी

**सुराज्य/सोलापूर**

शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी अथवा शिक्षकांची वयाची ८०, ८५ आणि ९५ वर्षे पुर्ण झाल्यानंतर पेन्शनमध्ये अनुक्रमे १०, १५ आणि २० टक्के पेन्शनमध्ये वाढ करण्याची तरतूद आहे. जिल्हा परिषद सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या ज्येष्ठ शिक्षकांना सदरची वाढ देताना पंचायत समिती स्तरावर शाळा सोडल्याच्या दाखल्याची मागणी करीत आहेत. तरी या वयस्क पेन्शनधारकांना शाळा सोडल्याच्या दाखल्याची मागणी करू नये, अशा मागणीचे निवेदन सोलापूर जिल्हा सेवानिवृत्त शिक्षक संघांच्यावतीने अध्यक्ष शिवानंद भरले यांनी दिले आहे.

भरले म्हणाले, वास्तविक पाहता या सेवानिवृत्त शिक्षकांचे पीपीओ आदेश कार्यालयातच असते. या आदेशात सेवानिवृत्त शिक्षकांच्या जन्म तारखेसह कुटुंबाची माहिती असते. याच आधारावरून वयवाढ निश्चित करून त्या सेवानिवृत्त शिक्षकांना १०,१५ आणि २० टक्के पेन्शन वाढ करण्यात यावीत. शाळा सोडल्याच्या दाखल्याची मागणी करू नये.

यावेळी अध्यक्ष शिवानंद भरले, कार्याध्यक्ष सुभाष फुलारी, सरचिटणीस मल्लिकार्जून बडदाळ, रमेश गायकवाड, माळशीरसचे अध्यक्ष सुधीर नाचणे, उत्तर सोलापूरचे अध्यक्ष बसवणप्पा जिरगे आदी पदाधिकारी उपस्थित होते.



### भविष्य निर्वाह निधी कार्यालयात अपुरे कर्मचारी

भविष्य निर्वाह निधी विभागात अपुरे कर्मचारी असल्याने सेवानिवृत्ताच्याफंडाची अंतिम बिले चार-पाच महिने झाले तरी मिळत नाहीत. या विभागाला कर्मचारी उपलब्ध करून द्यावीत. गटविमा लवकर मंजूर करावेत. पेन्शन अदालतीला सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांना बोलावण्यात यावं. अशी मागणी स्मिता पाटील यांच्याकडे केली.

# हिंदू जनजागृती समिती राबविणार 'मी सनातन धर्मरक्षक अभियान'

**सोलापूर** : हिंदू जनजागृती समितीच्यावतीने सनातन धर्माच्या रक्षणासाठी 'मी सनातन धर्म रक्षक' अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रीय प्रवक्ते रमेश शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सर्वोच्च न्यायालयाने दि. २८ एप्रिल २०२३ रोजी जर कुणी हेट स्पीच करून कोणत्याही समाजाच्या भावना दुखावण्याचा प्रयत्न करेल तर सरकारने तक्रारदाराची वाट न पाहता स्वतःच दखल घेऊन प्राथमिक तक्रार दाखल केली पाहिजे. याच सरकारने विलंब केल्यास त्याला सर्वोच्च न्यायालयाचा अवमान मानले जाईल, असा स्पष्ट आदेश दिला आहे. तरीही अद्यापही सनातन धर्माच्या विरोधात वक्तव्य करणाऱ्यांवर गुन्हा दाखल का झाला नाही, असा प्रश्न राष्ट्रीय प्रवक्ते रमेश शिंदे यांनी यावेळी उपस्थित केला. संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याबरोबरच एनआयएकडून चौकशी करण्यात यावी. सरकारला त्यांच्यावर कारवाई करण्यास भाग पाडण्यासाठी 'मी सनातन धर्म रक्षक' हे अभियान राबविण्यात येणार आहे. सनातन धर्माचे महत्त्व सांगणारी व्याख्याने घेतली जाणार आहेत, असेही शिंदे यांनी सांगितले. यावेळी राजेंद्र बुणगे, दत्तात्रय पिसे, वेणुगोपाल जिल्ला उपस्थित होते.



# ज्याला गुरुप्राप्ती झाली, तोच सर्वात भाग्यवान

### जगद्गुरु चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींचे आर्शिवचन

**सुराज्य/सोलापूर**

संसारातील सर्व जीव लाभासाठी प्रयत्नशील असतात. या सर्व लाभांमध्ये गुरुलाभ हा सर्वश्रेष्ठ लाभ आहे. ज्याला हा लाभ झाला तो सर्वात भाग्यवान आहे, असे श्रीकाशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींनी वाराणशी येथे आयोजित आशीर्वचनात सांगितले.

काशीपीठामध्ये काशीपीठाचे ८५ वे जगद्गुरू लिं. विश्वेश्वर शिवाचार्य महास्वामीजींच्या ३४ व्या पुण्यतिथी सोहळ्यात महास्वामीजींनी आशीर्वचनात विचार मांडले.

काशीपीठाच्या गुरुकुलातील विद्यार्थ्यांनी समाधीला रुद्राभिषेक, बिल्वार्चना अर्पण केले. सर्व भक्तांसाठी महाप्रसादाची व्यवस्था केली होती.

यावेळी काशी वीरशैव विद्वत् संघाचे कार्यदर्शी अखिलेश देव, विद्यार्थी गुरुकुलाचे वेद प्रा. पं. मल्लिकार्जुन शास्त्री, सहाय्यक प्रा. शिवमुर्ती हिरेमठ यांनी रुद्राभिषेकात सहभागी होऊन धर्मसभेत मनोगत व्यक्त केले. मठाचे प्रबंधक नलिनी चिरमे, आर. के. स्वामी, शिवानंद हिरेमठ उपस्थित होते.

# सांगोला भुयारी गटारी योजनेसाठी ९६ कोटी ६३ लाखांची मंजुरी

### आ. शहाजीबापू पाटील यांची माहिती

**सुराज्य/सांगोला**

गेल्या बारा वर्षापासून रेंगाळलेल्या सांगोला शहर भुयारी गटार योजनेच्या कामाला अखेर मंजुरी मिळाली असून, योजनेच्या पहिल्या टप्प्याच्या कामासाठी ९६ कोटी ६३ लाख रुपये मंजूर झाल्याची माहिती आमदार शहाजी पाटील यांनी दिली.



सन २०११ पासून प्रलंबित असलेल्या सांगोला शहर भुयारी गटारी योजनेच्या कामाला मंजूर मिळण्यासाठी आ. पाटील यांनी आमदार झाल्यापासून सातत्याने पाठपुरावा केला होता. सुरुवातीला ५० कोटी रुपये खर्च अपेक्षित असलेल्या या योजनेचा खर्च आता १२५ कोटी रुपयांपर्यंत गेला आहे. त्यामधील पहिल्या टप्प्यात ९६ कोटी ६३ लाख रुपयांच्या कामाला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आ. शहाजीबापूंच्या मागणीला मान्यता देऊन निधी मंजूर केला आहे.

### लवकरच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक

याअंतर्गत ८६ कोटी ९६ लाख रुपये महाराष्ट्र शासनाकडून अनुदान मिळणार असून, उर्वरित ९ कोटी ६६ लाख रुपये सांगोला नगरपरिषदेला द्यावे लागणार आहेत. पहिल्या टप्प्यामध्ये सांडपाणी प्रक्रिया क्षमता, विविध ठिकाणी सांडपाणी गोळा करण्याची व्यवस्था करणे, जलशुद्धीकरण केंद्राजवळ सांडपाण्यावर प्रक्रिया करणे. यामध्ये ट्रंकमेन, पंपिंग स्टेशन, जलशुद्धी केंद्र व नालाबंध ही कामे पूर्ण करण्यात येणार आहेत. दुसऱ्या टप्प्यांमध्ये मल वाहिन्यांची व्यवस्था करून पहिल्या टप्प्यांमध्ये निर्माण केलेल्या मलप्रक्रिया व्यवस्थेस जोडण्यात येणार आहे. सदरचे काम सांगोला नगरपरिषदेमार्फत करण्यात येणार आहे. यासाठी लवकरच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्यात येणार आहे.

# एकरकमी एफआरपीसह ४०० रूपये फरक द्या

## वजनकाटे डिजीटल करा; २५ किलोमीटरची अट काढा; भाजप किसान मोर्चाची मागणी

**सुराज्य/सोलापूर**

मागील वर्षी साखर कारखान्यांनी साखर आणि इथेनॉल विक्रीतून अधिकचे पैसेमिळवले आहेत, साखरेचे उत्पादन कमी करून इथेनॉल उत्पादन करण्यात आले आहे. प्रत्येक कारखान्याने तीन ते चार टक्के रिकव्हरी हे इथेनॉल निर्मितीसाठी वापरली आहे. हे सर्व पैसे कारखान्याकडे आहेत. त्यामुळे यंदाच्या वर्षी एक रक्कमी एफआरपीसह चारशे रुपये फरक ऊस उत्पादकांना देण्यात यावेत. कारण हे सहज शक्य आहे, कारखान्याची बॅलन्स शीट पहिली तर आपल्याला हे लक्षात येईल.अशी मागणी भाजप किसान मोर्चाच्या शिष्टमंडळाने साखर आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या कडे केली आहे.

सन २०२२-२३ च्या हंगामामध्ये प्रॉफिट एरियर्स गुणसूत्रानुसार आणखी ४०० रुपये प्रति टन इतका फरक शेतकऱ्यांना देण्यात यावा. यासाठी साखर आयुक्तालयामार्फत साखर कारखानदार व शेतकरी प्रतिनिधींची बैठक लावण्यात यावी. शेतकऱ्यांना एकरकमी एफआरपी प्राप्त व्हावी. जिल्हास्तरावर साखर कारखानदार, शेतकरी संघटना यांच्या समन्वय बैठकीमध्ये भाजप किसान मोर्चाचे प्रत्येक जिल्ह्यात किमान दोन प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात यावे. यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सुचित करण्यात यावे.

तरी सर्व मागण्यांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. अशा आशयाचे निवेदन भाजप किसान मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष गणेश भेगडे यांच्या नेतृत्त्वाखालील शिष्टमंडळाने दिले आहे. यावेळी पश्चिम महाराष्ट्रातील ऊस



उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध समस्यांच्या उपाययोजनांसाठी चर्चा करून तत्काळ मार्ग काढण्याचे आश्वासन देण्यात आले.

यावेळी संदीप गिड्डे पाटील, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष दादासाहेब सातव, किसान मोर्चाचे प्रदेश सचिव माऊली हळणवर, मनोज कासवा, जयेश शिंदे, भगवानराव काटे, प्रदेश कार्यकारणी सदस्य विश्रांती भुसनर, नितीन गडदरे, अग्रिकोसचे प्रदेश संयोजक राहुल भोसले, जिल्हाध्यक्ष तानाजी थोरात, सचिन मचाले उपस्थित होते.

### या आहेत अन्य मागण्या

शेतकऱ्यांनी बाहेरील वजन काट्यावर वजन करून आणल्यास सदरचा ऊस तातडीने वजन न करता, विनाअट स्वीकारण्यात यावा.साखर कारखान्यांवरील वजन काट्यांची वेळोवेळी तपासणी व्हावी. उसाचे वजन तत्काळ ऑनलाईन उपलब्ध व्हावे. सर्व वजनकाटे डीजिटल करण्यात यावेत. उसावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांसाठी २५ किलोमीटरची अट काढून टाकण्यात यावी.साखर कारखान्याकडून अदा होणाऱ्या बिलातून थेट कर्ज वसुली करण्यात येऊ नये. साखर कारखानदारांना मुकादम किंवा ऊस वाहतूकदार यांच्यासाठी परस्पर ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर बोजा चढवून कर्ज देण्यात येऊ नये, असे कर्ज दिल्यास असा बोजा लवकरात लवकर काढण्यासंदर्भात सहकार आयुक्तांना सूचित करण्यात यावे.

# दक्षिण तालुका दुष्काळ जाहीर करा

## ...अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा

**सुराज्य/दक्षिण सोलापूर**

शासनाने दक्षिण तालुका दुष्काळ म्हणून जाहीर करावा, अन्यथा माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर-हैद्राबाद हा महामार्ग रोखण्याबरोबरच चक्काजाम आंदोलन करूख असा इशारा माजी पंचायत समिती सदस्य धनेश आचलारे यांनी दिला आहे.

यावेळी आचलारे म्हणाले, यंदा रोहिणी, मृग, आर्द्रा, पुनर्वसु, आश्लेषा, मघा असे एकापाठोपाठ एक नक्षत्रे कोरडी गेल्याने दक्षिण सोलापूर तालुक्यात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे.

सीना-भीमा आणि हरणा या तीनही नद्या कोरड्या पडलेल्या आहेत. तालुक्यात अशी भीषण स्थिती असतानाही शासनाने दक्षिण सोलापूरला दुष्काळी यादीतून वगळले आहे. हा प्रकार संतापजनक आहे.

त्यानंतर बोरामणी, तांदूळवाडी, मुस्ती, कुंभारी, वळसंग, आहेरवाडी, होटगी, हत्तूर मंद्रूप, बसवनगर, औराद, वडकबाळ,भंडारकवठे,कंदलगाव, वांगी, गुंजेगाव, टाकळी या परिसरात पुष्या नक्षत्रात चार- पाच दिवस संततधार पाऊस झाल्याने खरीप हंगामातील तूर, मूग, उडीद, मटकी व इतर पिकांची पेरणी झाली.या पिकांची उगवणही चांगल्याप्रकारे झाली. मात्र, त्यानंतर आश्लेषा, मघा, पूर्वा,




उत्तरा, हस्त ही नक्षत्रे कोरडी गेल्याने खरीप हंगामातील सर्व पिकांनी अक्षरशः माना टाकल्या आहेत. सध्या शेत-शिवा-यात आणि गावागावात भीषण पाणीटंचाई निर्माण होत आहे. पाऊस नसल्याने विहीर व बोअर तळ गाठला आहे.सीना व भीमा, हरणा नदींत अपेक्षित पाणीसाठा नसल्याने ऊसपिकेही पाण्याविना करपून जात आहेत.

शेतात विजेचा वापर कमी असतानाही वीज मंडळ मात्र,शेतक-यांना भरमसाठ वीजबील माथी मारत आहे.त्यामुळे बळीराजा पूरता कोलमडून पडला आहे.

यावेळी धनेश आचलारे, आप्पा हलसगे, दाऊद मुजावर,बंडू मस्के, गणेश जांगटे, नारायण बोकडे, विक्रम मिटकरी, लक्ष्मण जाधव, नारायण जाधव, कृष्णा जाधव, बालाजी जाधव,चंद्रकांत चव्हाण, सोमनाथ विभुते, चन्नवीर बिराजदार, पांडुरंग वानकर, प्रशांत जाधव, राहूल जाधव उपस्थित होते.

# आरोग्यावर दुष्परिणाम करणाऱ्या रसायनांच्या दुष्परिणामांवर जालीम उपाय

- प्रा.अशोकराव शिंदे यांचे संशोधन
- संजीवन कृषी चिकित्सा प्रणाली
- कृषी क्षेत्रातील अभिनव संशोधन



✔ सुराज्य/सांगोला

आरोग्यावर परिणाम करणाऱ्या विविध रसायनांच्या दुष्परिणामांवर प्रा.अशोकराव शिंदे यांनी संशोधन करीत जालीम उपाय शोधला आहे. त्यांची ही संजीवन कृषी चिकित्सा प्रणाली म्हणजे कृषी क्षेत्रातील अभिनव संशोधन ठरणार आहे.

दैनंदिन जीवनात आपण आहारात खाण्यासाठी नेहमी फळे, भाज्या, अन्नधान्यांचा वापर करतो. परंतु, सध्या, पिके, अन्नधान्ये, फळे व भाज्यांवर पडणारी रोगराई आणि किडींचा नायनाट करणे, रोगराई नियंत्रणात आणण्यासाठी शेतकरी वर्गाकडून रसायने फवारली जातात. त्यामुळे,पिके,फळे व भाजीपाल्यांची गुणवत्ता कमी होत असून फवारणीनंतर रसायनांचे उर्वरीत अंश हे फळे, भाज्या व अन्नधान्यांमधून प्रत्येकांच्या पोटात येत आहेत.

त्याचा परिणाम मानवी आरोग्याबरोबरच पशू-पक्षी व प्राण्यांच्या आरोग्यावरही होत आहे. शिवाय, माती व पाण्यासारख्या नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास रसायनांमुळे होत आहे. यावर जालीम उपाय म्हणून संजीवन कृषी चिकित्सा प्रणाली विकसित केल्याची माहिती सांगोला येथील प्रा.डॉ. अशोकराव शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### काय आहे संशोधन...

संजीवन कृषी चिकित्सा प्रणाली या प्रणालीमधून रसशोषक किडी,बुरशी, जीवाणू, विषाणुंना कोणत्याही बुरशीनाशक किंवा किटकनाशकाशिवाय मारता येते. यामध्ये सेंद्रीय रसायने व उपयुक्त सुक्ष्मजीवांचा एकत्रित वापर केलेला आहे. त्यांच्या एकत्रित मिश्रणामुळे औषधी सिनर्जिकल प्रभाव तयार करण्यात येऊन रोग व किडींच्या शरीरातील पाण्याचा अंश काढला जातो. रोग व किडीसाठी कारणीभुत सुक्ष्म जीवजंतू कोणत्याही विषारी औषधाशिवाय डिहायड्रेशन होऊन मारले जातात. पिकांवर रासायनिक औषधांमुळे येणारा ताण या प्रणालीमध्ये येत नाही. उलट टॉनिक मारल्यामुळे त्याचा परिणाम वनस्पती हिरवीगार व टवटवीत होऊन निरोगी वाढ होते. हरीतलवके तयार होण्याचा वेग वाढतो. त्यामुळे पिकांची वाढ चांगली व जोमाने होते.

# शेतकऱ्यांची आता त्रासातून होणार सुटका

## शेतीमाल कीटकनाशक अंश तपासणी प्रयोगशाळा सांगलीत होणार

- सोलापूरसह सहा जिल्ह्यांना लाभ होणार
- १७ कोटींची कीटकनाशक उर्वरित अंश तपासणी प्रयोगशाळा मंजूर

✔ सुराज्य/सोलापूर

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मालाची निर्यात करण्यासाठी कीटकनाशक उर्वरित अंश तपासणीची शासनाने सक्ती केली आहे. या तपासणीसाठी यापूर्वी शेतकऱ्यांना आर्थिक आणि मानसिक त्रास होत होता. या त्रासातून शेतकऱ्यांची आता सुटका होणार आहे. सांगलीला यासाठी राज्य शासनाने १७ कोटी रुपयांची कीटकनाशक उर्वरित अंश तपासणी प्रयोगशाळा मंजूर केली आहे. याचा लाभ सांगलीसह सोलापूर, कोल्हापूर, सातारा, सिंधुदुर्ग, रत्नागिरीतील उत्पादकांना होणार आहे.

परदेशात कीटकनाशक उर्वरित अंश विरहित शेतीमालाला मोठ्या प्रमाणात मागणी असते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत शेतीमाल पाठविण्यापूर्वी भाजीपाला, फळांमधील कीटकनाशकांची उर्वरित अंशाची तपासणी करून त्याची गुणवत्ता तपासल्यास शेतकरी व निर्यातदारांना फायदा होतो. युरोप राष्ट्रात द्राक्ष, डाळिंब पाठविण्यासाठी फळातील कीटकनाशकांचा अंश तपासणी प्रमाणपत्र सक्तीचे आहे.यासाठी कीटकनाशक अंश तपासणीच्या शासकीय प्रयोगशाळा पुणे, नागपूर येथेच आहेत. याशिवाय खासगी प्रयोगशाळा आहेत. पण, तेथील तपासणी खर्चीक असल्यामुळे शेतकऱ्यांना परवडत नाही. म्हणूनच निर्यातदार शेतकऱ्यांनी कीटकनाशके अंश तपासणी प्रयोगशाळा सांगली जिल्ह्यात करण्याची लोकप्रतिनिधींकडे मागणी केली होती.



अखेर राज्य शासनाने सांगली आणि नाशिक जिल्ह्यासाठी कीटकनाशक अंश तपासणी प्रयोगशाळा मंजूर केली आहे. प्रत्येक प्रयोगशाळेसाठी १७ कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित आहे. इमारत, प्रयोगशाळा साहित्यांची खरेदी होणार आहे.

### कृषीमाल निर्यातीत महाराष्ट्र अग्रेसर

महाराष्ट्रात द्राक्ष, डाळिंब, आंबा, कांदा व इतर भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. देशाच्या एकूण निर्यातीपैकी ९८ टक्के द्राक्ष, ७६ टक्के आंबा, ४९ टक्के कांदा, २७ टक्के इतर फळे, १८ टक्के इतर भाजीपाला महाराष्ट्रातून निर्यात होतो. म्हणूनच महाराष्ट्र राज्य फलोत्पादनाच्या उत्पादन व निर्यातीत अग्रेसर राज्य आहे, असे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### अशी तपासतात मात्रा

कीटकनाशक नमुने तपासणी तीन पद्धतीने केली जाते. पहिल्या प्रकारात भाजीपाला, फळांच्या नमुन्यांचा मिक्सरमध्ये लगदा करून त्याचा १० मिलीलिटर द्रव तयार केला जातो. प्रतिमिली ग्रॅम प्रतिकिलो यानुसार नमुना तपासून पीएफएची मात्रा ठरविली जाते. द्रव पदार्थांच्या तपासणीसाठी देखील हाच निकष वापरून दूध आणि पाण्याच्या नमुन्यांची तपासणी होते. धान्याच्या नमुन्यासाठी देखील वेगळे निकष आहेत.

# शिवशक्ती महामार्गाची मागणी; कावड यात्रेचे बेंबळीत स्वागत

✔ सुराज्य/टेंभुर्णी

तुळजापूरचे शक्तीपीठ व श्री क्षेत्र शिखर शिंगणापूरचे शिवपीठ या तीर्थक्षेत्रास जोडणारा शिवशक्ती महामार्ग करा, या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी शिंदे-शिवसेनेच्या संपर्क प्रमुख संजय कोकाटे यांच्या नेतृत्त्वाखाली निघालेल्या पायी कावड यात्रेचे बेंबळे येथे जल्लोषात स्वागत केले.

यावेळी बेंबळे ग्रामस्थांतर्फे सरपंच विजय पवार, उपसरपंच नमिता अनपट, गोविंद भोसले, रत्नाकर कुलकर्णी, पोपट अनपट, यशवंत भोसले यांनी कावड यात्रेतील शिवशक्तांचे स्वागत केले. यावेळी बेंबळेत स्वागत सभेत संजय कोकाटे, दादासाहेब साठे, बाळासाहेब पाटील, प्रा. सुहास पाटील, संजय



घाटणेकर यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी दादासाहेब साठे, सुहास पाटील, संजय पाटील-घाटणेकर, बाळासाहेब पाटील, दीपक खोचरे, योगेश पाटील, राहूल कुलकर्णी, गोविंद पवार, अशोक देवकर, नवनाथ सुरवसे, तुकाराम पाटील, श्रीपती मिटकल, नंदकुमार पाटील, उपस्थित होते. यासाठी दादासाहेब साठे, ॲड. बाळासाहेब पाटील, सुहास पाटील, अनिल पाटील, ज्ञानेश्वर सलगर, विनोद पाटील, औदुंबर महाडीक, डॉ. प्रदीप पाटील, योगेश पाटील, सुधीर पाटील, राजाभाऊ चवरे, राहूल पाटील, नितीन साठे, अजिनाथ माळी, विजय पवार, हनुमंत भोसले, संतोष लोंढे, सुरेश यादव, संतोष दळवी, राहुल जाधव उपस्थित होते.

### आणखी ११९ किमी अंतराचे काम बाकी...

शिखर शिंगणापूरपासून लवंगपर्यंत (माळशिरस) पालखी महामार्गाचे काम पूर्ण झाले आहे. तुळजापूर, माढा, वैराग, चिंचोली, भुताष्टे, पडसाळी भेंड वरवडे, परितेवाडी, परिते, बेंबळे, वाफेगाव व लवंग असे ११९ किमी अंतराचे काम बाकी आहे. दोन्ही तीर्थ क्षेत्रे चौपदरी महामार्गाने जोडण्यात यावेत. यासाठी संजय कोकाटे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे निवेदन दिले आहे. विशेष बाब म्हणून शिवशक्ती मार्गास मान्यता देण्याची मागणी केली आहे.



# विनायक हेगडे, सानिया पाटणकर यांच्या सुमधूर गायनाने पंढरीकर झाले मंत्रमुग्ध

**पंढरपूर** : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्यावतीने आयोजित श्री रुक्मिणी नवरात्र संगीत महोत्सवात पाचवे पुष्प ख्यातनाम गायक विनायक हेगडे आणि गायिका सानिया पाटणकर यांनी गुंफले. त्यांच्या सुमधून गायनाने पंढरीकर झाले मंत्रमुग्ध.

सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम सुरु आहे. यावेळी ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, गायिका सानिया पाटणकर, गायक विनायक हेगडे, अभिजीत बारटक्के, सतीश कट्टी, ज्ञानेश्वर दुधाणे, वैभव जोशी उपस्थित होते. त्यांना तबला साथ अभिजित बारटक्के, हार्मोनियम सतीश भट, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे, टाळ वैभव जोशी, स्वरसाथ वेदवती परांजपे, सोमनाथ काशीद, तानपुरा गोपाळ अभंगराव यांनी सुरेख साथ दिली. आभारप्रदर्शन विक्रम बिस्किटे यांनी केले.

### औदुंबर झिंगाडे यांचे निधन



**अक्कलकोट** : महादेवनगर, बासलेगाव रोड येथील औदुंबर धोंडीबा झिंगाडे यांचे आकस्मिक निधन झाले. मृत्युसमयी ते ५८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, पाच मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# कंत्राटी नौकर भरतीचं पाप महाविकास आघाडी सरकारनं केलं

## मविआ नेत्यांच्या विरोधात भाजपचे माफी मागो आंदोलन




### अक्कलकोट

✔ **अक्कलकोट** : कंत्राटी भरतीवरून महाराष्ट्रातील लाखो बेरोजगार तरुणांची दिशाभूल करण्याचे काम उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केल्याचे आरोप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

भाजपच्यावतीने आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली ए-वन चौक येथे माफीनामा आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी आ. कल्याणशेट्टी हे बोलत होते.

यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस शशिकांत चव्हाण, तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, शहराध्यक्ष शिवशरण जोजन, महिलाध्यक्ष सुरेखा होळीकट्टी, अध्यक्ष शिवानंद पाटील, महेश हिंडोळे, रमेश कापसे, मिलन कल्याणशेट्टी, महिबूब मुल्ला, अप्पू परमशेट्टी, चिदानंद उन्नद, अण्णाराव बाराचारी, परमेश्वर यादवाड, प्रदीप पाटील, अक्षय वाडकर, मधुकर चिवरे, अनिल पाटील, दयानंद बमनळ्ळी, सुनील दसले, राजू थंब, संजय बागनगरे, बाळा शिंदे, देविदास गवंडी, राहुल वाडे, दयानंद बिडवे, अतिष पवार, अंकुश चौगुले, सुदर्शन यादव, शंकरराव भांजे, नन्नू कोरबू, सिद्धेश्वर माळी, सागर तेली, बबलू कामनूरकर, सागर डिग्गे उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. सचिन कल्याणशेट्टी म्हणाले, कंत्राटी भरतीचे महापाप करणारे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, खासदार शरद पवार व काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, मविआने महाराष्ट्राची नाक घासून माफी मागावी.

### सोलापूर

✔ **सोलापूर** : कंत्राटी कर्मचारी भरतीच्या निर्णयाचे जनक काँग्रेस व महाविकास आघाडी असून, त्यांनी केलेल्या कंत्राटी कर्मचारी भरतीमुळेच महाराष्ट्रातील लाखो तरुण बेरोजगार झाले आहेत. कंत्राटी भरती करून लोकांची दिशाभूल करीत आहेत. त्या आघाडी सरकारचा निषेध करण्यासाठी भारतीय जनता पार्टी सोलापूर शहरच्यावतीने अध्यक्ष नरेंद्र काळे यांच्या नेतृत्त्वाखाली कन्ना चौकात माफी मागो,जोडो मारो आंदोलन करण्यात आले.

याप्रसंगी पांडुरंग वडवळ, नारायण बनसोडे, रामचंद्र जन्नू, विजयाताई वडेपल्ली,




श्रीकांचना यन्नम, रोहिणी तडवळकर, सतीश महाले प्रशांत फत्तेपूरकर, लक्ष्मण गायकवाड, अनिल कंदलगी, हेमंत पिंगळे उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना अध्यक्ष नरेंद्र काळे म्हणाले, आघाडी सरकारने कंत्राटी पद्धतीने कर्मचारी भरती करून सर्वसामान्य युवकांची फसवणूक केली आहे. जोपर्यंत महाविकास आघाडीच्या नेते जाहीर माफी मागत नाही तोपर्यंत भाजपा निषेध करत राहणार. आघाडीच्या नेत्यांनी केलेला पाप लोक विसरणार नाहीत.

### मोहोळ

✔ **मोहोळ** : महाविकास आघाडी सरकारने घेतलेला कंत्राटी भरतीचा निर्णय भाजपाच्या सरकारने रद्द केला, असे सांगत भाजपाच्यावतीने महाविकास आघाडीच्या सरकारला जोडे मारो आंदोलन करण्यात आले.

या विरोधात मोहोळ नगरपरिषदेसमोर मोहोळ तालुका, शहर भाजपा व युवा मोर्चाद्वारे महाविकास आघाडीच्या नेते मंडळीच्या फोटोवर जोडे




मारो व माफिनामा द्यावा, म्हणून आंदोलन करण्यात आले. कंत्राटी भरतीचे महापाप करणारे उद्धव ठाकरे, शरद पवार, नाना पटोले आणि मविआने महाराष्ट्राची माफी मागावी, अशी मागणी केली.

यावेळी किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष शंकरराव वाघमारे, तालुकाध्यक्ष सुनील चव्हाण, शहराध्यक्ष सुशील क्षीरसागर, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष गणेश झाडे यांनी आंदोलनात मविआविरुद्ध तीव्र शब्दात विचार मांडले. यावेळी संजय क्षीरसागर, जिल्हा उपाध्यक्ष .सतीश काळे, प्रदेश कार्यकारणचे संजीव खिलारे, दिलीप गायकवाड, शशिकांत गावडे, ज्ञानेश्वर भोसले, रमेश माने, मुजीब मुजावर, विष्णुपंत चव्हाण, फंटू गोफने, अविनाश पांढरे, नागेश क्षीरसागर, अंकुश अवताडे, दीपक पुजारी अमोल व्यवहारे, राहुल व्यवहारे, दिलीप पाटील, गुरुराज तागडे उपस्थित होते.

### सांगोला

✔ **सांगोला** : कंत्राटी भरतीचा जीआर हा महाविकास आघाडी सरकारच्या काळात काढण्यात आला होता. सुशिक्षित बेरोजगार तरुणांच्या शासकीय नोकर भरतीच्या प्रक्रियेत सगळयात मोठं पाप महाविकास आघाडी सरकारने केले असल्याचा हल्लाबोल भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी केला आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कंत्राटी भरतीचा निर्णय रद्द करण्याचा निर्णय घेतला असल्याची घोषणा पत्रकार परिषदेत केली. त्यानंतर महाविकास आघाडीच्या निर्णयाच्या विरोधात जिल्हा भाजपच्या वतीने करमाळा शहरात तीव्र आंदोलन करून निषेध व्यक्त केला. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत बोलत होते.

यावेळी जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे, सचिन शिंदे, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष शंभुराजे जगताप, शशिकांत पवार, सुहास घोलप, जगदीश अग्रवाल, नितीन कांबळे, दीपक चव्हाण, पैलवान अफसर जाधव, रामभाऊ ढाणे, कपिल मंडलिक, किरण बोकण, बाळासाहेब कुंभार, चंपावती कांबळे, श्याम सिंधी, लक्ष्मण केकाण, नरेंद्र ठाकूर, चंद्रकांत राखुंडे,अमरजित साळुंके, सुहास ओव्हळ, सचिन चव्हाण, रघुनाथ सावंत, ओंकार घोंगडे, विश्वजित जगदाळे, संदीप पवार, वनराज घोलप, बाळासाहेब तळेकर यांच्या असंख्य कार्यकर्ते,पदाधिकारी उपस्थित होते.



# तडवळच्या व्हीपी शुगर्स कारखान्यातील कर्मचाऱ्यांना पगारवाढीची 'दिवाळी भेट'

## प्रशासनाने घेतला निर्णय : सहा लाख मेट्रीक टन गाळपाचे उद्दिष्ट; तडवळच्या व्हीपी शुगर्स कारखान्याचा बॉयलरअग्निप्रदीपन सोहळा उत्साहात

✔ सुराज्य/सोलापूर

तडवळ येथील व्हीपी शुगर्स लि. साखर कारखान्यातील सर्व कर्मचाऱ्यांची यंदा दिवाळी आणखीन गोड होणार आहे. कारण सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ऑक्टोबरपासून पगार वाढ करण्याचा निर्णय कारखान्याच्या संचालक मंडळाने घेतला आहे. ऐन दिवाळीच्या तोंडावर संचालक मंडळाने कर्मचाऱ्यांसाठी दिलेली ही दिवाळीची गोड भेट असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये आंनदाचे वातावरण पसरले आहे.

तडवळ येथील व्हीपी शुगर्स लिमिटेड या साखर कारखान्याचा सन २०२३-२४ च्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. त्यावेळी कारखान्याचे चेअरमन सीए व्ही. पी. पाटील यांनी पगारवाढीचा निर्णय जाहीर केला.

प्रारंभी होमहवन व विधिवत पूजा करण्यात आली. व्हाईस प्रेसिडेंट साहेबराव पाटील, अर्चना पाटील, कारखान्याचे मुख्य शेती



अधिकारी राजाभाऊ खटके, धनश्री खटके यांच्या हस्ते झाले. बॉयलर अग्नीप्रदीपन कारखान्याचे चेअरमन सीए व्ही. पी. पाटील, भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, जनकल्याण बँकचे चेअरमन राजेंद्र हजारे, तडवळ गावचे सरपंच संतोष कुंभार, श्रीशैल करजगी, अक्कलकोटचे माजी सभापती प्रकाश हिप्परगी, बाजार समिती संचालक बाबुशा करपे यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी चेअरमन सीए व्ही. पी पाटील, व्हा. चेअरमन गोकुळ शिंदे, कार्यकारी तज्ञ संचालक आशिष पाटील, प्रेसिडेंट साहेबराव पाटील, व्हा. प्रेसिडेंट धीरज शिंदे, मुख्य शेती अधिकारी राजाभाऊ खटके, संदीप पाटील, चिफ इंजिनिअर अमोल दगडे, कोजन मॅनेजर सूरज झगडे, चिफ केमिस्ट मेघराज कदम, बसवराज इंडे, संगप्पा पाटील, यासीन कुमठे, दयानंद कोरे उपस्थित होते.

व्हीपी शुगर्स कारखान्याचे मागील गळीत हंगामातील ऊस बिले व तोडणी वाहतूक बिले वेळेत अदा केलेली आहेत. चालू गळीत हंगामामध्ये शेतकऱ्यांची ऊस बिले व तोडणी वाहतूक ठेकेदारांची बिले वेळेत देण्याची परंपरा व्हीपी शुगर्स कारखाना कायम ठेवणार असल्याचे चेअरमन पाटील यांनी सांगितले.

### २४ हजार हेक्टर उसाची नोंद...

कारखान्याकडे २४ हजार हेक्टर उसाची लागण नोंद झाली आहे. ऊस तोडणी वाहतूकीसाठी ४०० ट्रॅक्टर १०० ट्रक १५० मिनी ट्रॅक्टर व २१ ऊस तोडणी यंत्राचे बिगर ॲडव्हांन्समध्ये करार केलेले आहेत. गळीत हंगाम २०२३-२४ मध्ये कारखान्याचे ६ लाख मेट्रीक टन गाळप करण्याचे उद्दिष्ट आहे.

# जुन्या पेन्शन योजनेसाठी सरकारी कर्मचाऱ्यांची पुन्हा आंदोलनाची हाक

✔ सुराज्य/मुंबई

**राज्यात पुन्हा एकदा जुन्या पेन्शनचा मुद्दा तापण्याची शक्यता आहे. मागील संपानंतरही राज्य सरकारकडून सकारात्मक हालचाली होत नसल्याने आतात राज्य सरकारी, निम सरकारी कर्मचारी संघटनांची शनिवारी बैठक झाली. या बैठकीत संघटनांनी आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता ऐन निवडणुकीच्या तोंडावर सरकारला कर्मचाऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागणार आहे. पुढील महिन्यात एक दिवसीय आंदोलनाने जुन्या पेन्शनसाठीच्या आंदोलनाची सुरुवात होणार आहे.**

सर्व सरकारी, निमसरकारी कर्मचारी संघटनांची शनिवारी मुंबईत बैठक झाली. आजच्या बैठकीत आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला. जुन्या पेन्शनसाठी सरकारी कर्मचाऱ्यांचे १८ नोव्हेंबरला राज्यव्यापी एकदिवसीय आंदोलन होणार आहे. या आंदोलनाची दखल घेतली नाही, तर १४ डिसेंबरपासून पुन्हा बेमुदत उपोषणाच्या आंदोलनाचे हत्यार सरकारी- निमसरकारी कर्मचारी उपसणार आहेत. सर्व शासकीय संघटनाच्या आज झालेल्या बैठकीत हे निर्णय घेण्यात आले. सरकारने आश्वासन देऊन ही काही कार्यवाही न केल्याने आणि सरकारी कर्मचारी शिक्षकांना जुनी पेन्शन पूर्वलक्षी प्रभावाने लागू करा आदी १७ मागण्यांसाठी सरकारी कर्मचारी आंदोलन-संप करणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले आहे.

कर्मचारी शिक्षकांना जुनी पेन्शन पूर्वलक्षी प्रभावाने लागू करा तसेच इतर जिव्हाळ्याच्या १७ रास्त मागण्या मान्य करा यासाठी राज्यातील १७ लाख कर्मचारी, शिक्षक मार्च २०२३ मध्ये बेमुदत संपावर गेले होते. त्यावेळी जुनी पेन्शन आणि इतर मागण्यांबाबत मुख्यमंत्र्यांनी निसंदिग्ध आश्वासन दिल्यामुळे हा संप स्थगित करण्यात आला होता. मात्र, या कर्मचाऱ्यांच्या मागणीवर निर्णय झाला नसल्यामुळे राज्यातील १७ लाख सरकारी-निमसरकारी पेन्शन कर्मचारी पुन्हा संप आणि आंदोलनाच्या तयारीत आहेत. संप केल्यानंतरच्या गेल्या आठ महिन्यांत शासनाने आश्वासन पाळण्यासंदर्भात काहीही पुढाकार घेतल्याचे दिसत नाही. त्यामुळे सर्वदूर महाराष्ट्रातील सरकारी कर्मचारी शिक्षक कमालीचे संतप्त आहेत.



### मार्च महिन्यात झाला होता सात दिवसांचा संप

राज्य सरकारी, निमसरकारी त्यासोबतच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समितीच्या नेतृत्वात सात दिवसांचा संप झाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोबत बैठक झाली आणि जुन्या पेन्शन योजनेत संदर्भात चर्चा झाली. पूर्वलक्षी प्रभवाने जुनी पेन्शन योजना लागू होईल, असं आश्वासन लेखी स्वरुपात सरकारी कर्मचारी संघटनांच्या समन्वय समितीला देण्यात आल्यानंतर समन्वय समितीने संप मागे घेतला.

---

## दिवंगत नेते विनायक मेटेंच्या पुतण्याची आत्महत्या

✔ सुराज्य/बीड



शिवसंग्राम संघटनेचे दिवंगत नेते विनायक मेटे यांच्या पुतण्याने राहत्या गावी गळफास घेत आयुष्य संपवले आहे. ३४ वर्षीय सचिन मेटे याने आत्महत्या केल्याने खळबळ उडाली आहे. विनायक मेटे यांचे भाऊ त्रिंबक मेटे यांचा सचिन हा मुलगा आहे. सचिनने टोकाचं पाऊल का उचललं याचा तपास पोलीस करत आहेत.

दोन महिन्यांपूर्वीच विनायक मेटे यांच्या निधनाला वर्ष पूर्ण झाले होते. दरम्यान सचिन याने केलल्या आत्महत्येमुळे मेटे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. मागील वर्षी रस्ते अपघातात विनायक मेटेंचा अपघाती मृत्यू झाला होता. विनायक मेटेंच्या मृत्यूच्या धक्क्यातून मेटे कुटुंबीय सावरत असतानाच सचिनच्या आत्महत्येमुळे कुटुंबाला जबर धक्का बसला आहे.

## हायकोर्टाचा राज्याला दणका

**तब्बल ११२ न्यायाधीशांची नियुक्ती रद्द**

✔ सुराज्य/नागपूर

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग सदस्य आणि जिल्हा आयोग अध्यक्षांची रिक्त पदे भरण्यासाठी २५ जून रोजी घेतलेली परीक्षा रद्द ठरवित सरकारने केलेली ११२ सदस्य न्यायाधीशांची नियुक्ती रद्द करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ॲड. महेंद्र लिमये आणि बुलडाणा जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या माजी अध्यक्ष सुहास उंटवाले यांनी स्वतंत्र याचिका दाखल केली आहे. परिक्षेच्या अभ्यासक्रमात दिवाणी प्रक्रिया संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, भारतीय



पुरावा कायदा, भारतीय करार कायदा इत्यादी महत्वाच्या कायद्यांचा समावेश करण्यात आला नाही. ग्राहक आयोग अध्यक्ष आणि सदस्यांना या कायद्यांचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेच या भरतीसाठी राज्य सरकारने उच्च न्यायालयाचे एक वर्तमान न्यायमूर्ती व दोन सरकारी सचिवांचा समावेश असणारी निवड समिती स्थापन केली होती.

या समितीमध्ये सरकारचे पारडे जड आहे. त्यामुळे न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य धोक्यात येण्याची शक्यता आहे, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे होते. परीक्षेत निगेटिव्ह मार्किंगचा नियम होता. हा नियम याचिकाकर्त्यांना अमान्य होता. दरम्यान ही परीक्षा झाली. ती या याचिकेच्या निकालावर अवलंबून होती. या परिक्षेतून ११२ नव्या न्यायाधीशांची नियुक्ती करण्यात आली होती. आज प्रकरणी न्यायमूर्ती अतुल चांदूरकर आणि न्यायमूर्ती वृषाली जोशी यांच्यासमक्ष सुनावणी झाली. यावर न्यायालयाने सदर परीक्षा रद्द ठरवित न्यायाधीशांची नियुक्ती सुध्दा रद्द केली. याचिकाकर्त्यांकडून ॲड. सुबोध धर्माधिकारी, ॲड. तुषार मंडलेकर, ॲड. तेजस फडणवीस, ॲड. रोहन मालविय यांनी बाजू मांडली.

## नवरात्र उत्सवाला गालबोट! दोन गटात हाणामारी

✔ सुराज्य/ठाणे

डोंबिवली पूर्व येथील जुना रोड परिसरातील एका मंदिर येथे नवरात्र उत्सव सुरू असताना दोन गटात तुफान राडा झाल्याची घटना शुक्रवारी रात्री घडली. आयरे गाव येथे दोन दिवसांपूर्वी झालेल्या वादातून ती मारामारी झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ५० ते ६० जणांचा गट अचानक एकमेकांशी भिडल्याचे दृश्य पहायला मिळाले. यामुळे दर्शनासाठी आलेले भाविक भयभीत होऊन इतरत्र पळत सुटले. काय झाले हे समजण्याच्या आताच काही तरुण आपापसात भिडले. दगडांनी आणि चोपरने वार एकमेकांवर करण्यात आले. या हाणामारीत चार ते पाच जण गंभीर जखमी झाले आहेत.

या घटनेची माहिती मिळताच रामनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलीस येताच तरुणांनी तेथून पळ काढला. आहे.

---

## महिला सदस्यांनी पुढाकार घेवून सुरु केले दुर्गाशक्ती मंडळ



कार्यकर्त्यांच्या, मंडळाच्या अध्यक्षांच्या भूमिकेत महिला जाऊ शकत नाहीत हा एक सर्वसाधारण समज. तो खोडून काढत सोलापुरातील होटगी रोडवरील दुर्गाशक्ती नवरात्र महोत्सव महिला मंडळ गेल्या १० वर्षांपासून कार्यरत आहे.

### कर्नाटकातून बनविले देवीचे दागिने

देवीची मूर्तीही आकर्षक असून नवरात्रीच्या काळात मूर्तीला विविध वेषभूषेत सजविण्यात येते. देवीचे दागिने खास कर्नाटकातून बनविण्यात आले आहेत. या दागिन्यांमुळे देवीची मूर्ती अधिकच आकर्षित दिसत आहे.

### ५० महिलाचं लेझीम संघ

गणेशोत्सव आणि नवरात्रात प्रामुख्याने पुरुष मंडळी लेझीमचा खेळ सादर करतात मात्र दुर्गाशक्ती नवरात्रोत्सव मंडळाच्यावतीने मिरवणुकीत महिला लेझीम खेळतात. यंदा ५० महिलांचे लेझीम संघ आहे. हे या मंडळाचे प्रमुख वैशिष्ट्ये आहे.

समाजकार्य करण्यासाठी आणि परिसरात नवरात्रोत्सव मंडळ नसल्यामुळे सुवर्णा तोटंगुल-दास यांनी पुढाकार येत हे मंडळ सुरु केले. त्यांना यामध्ये इतर महिलांची साथ मिळाली. आणि दुर्गाशक्ती नवरात्र महोत्सव महिला मंडळ नावारुपास आले. आज हे मंडळ पूर्णपणे महिला वर्गाकडून चालविले जाते. या मंडळाच्या अध्यक्षांपासून ते सहसचिवापर्यंत सर्व महिलाच पदाधिकारी नेमण्यात आल्या आहेत. सदस्यही सर्व महिलाच असून पुरुषमंडळी फक्त सल्लागार म्हणून आहेत हे विशेष. २०१२ साली दुर्गाशक्ती नवरात्रोत्सव मंडळाची स्थापना संस्थापिका अध्यक्षा सुवर्णा तोटुंगल (दास) यांनी केली. गेल्या आठ वर्षापासून मोठ्या जल्लोषात आणि उत्साहात दरवर्षी विविध उपक्रम राबविले जातात. मंडळाच्या संस्थापिका स्वत: एक महिला असल्यामुळे त्यांनी महिलांचेच उपक्रम राबविण्यावर भर दिला आहे. महिलांसाठी आरोग्य शिबिर, रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, भारुडाचा कार्यक्रम आदी उपक्रम राबविले जातात. याशिवाय दरवर्षी महिलांसाठी आणि युवतींसाठी दांडिया कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. यावेळी मंडळाच्या अध्यक्षपदी अनिता वेर्णेकर, उपाध्यक्ष डॉ.प्राजक्ता तुंबळ, कोषाध्यक्ष सारिका मदने, अमृता पेंडकर, मिरवणूक प्रमुख शर्वरी रानडे, विद्या सदाफुले, सचिव पार्वती मंगरुळे, सहसचिव माधुरी अवटे, रेणुका सुरपूरकर यांची निवड करण्यात आली आहे.

## नवसाला पावणारी सदानंदी माता

**नवरात्र विशेष : सोलापुरातील विविध मंदिरातील देवींचे महात्म्य**

# प्रचिती आल्यानंतर ग्रामस्थांनी केला मंदिराचा जीर्णोध्दार

✔ सुराज्य/सोलापूर

हद्दवाढ भागातील मूळ गाव मजरेवाडी असून, या गावात आजही ग्रामीण भागातील वातावरण आहे. मजरेवाडी ग्रामपंचायत हद्दीतील भाग मात्र शहरासारखे दिसून येतो.

मजरेवाडी सुमारे ५६ नगरांनी वसलेली आहे. येथील ग्रामदैवत म्हणून सदानंदी मातेचा लौकिक दिवसेंदिवस वाढत आहे. नवसाला पावणारी ही देवी असल्याची श्रध्दा भक्तांना येत असल्यामुळे दिवसेंदिवस भाविकांच्या संख्येत वाढ होते. केवळ नवरात्रोत्सवाच्या काळातच नव्हे तर वर्षभर देवीची सकाळी आणि सायंकाळी नित्यनियमाने पूजा होत असते.

जुळे सोलापुरातील बहुतेक भाग हा मजरेवाडीत येतो. होटगी रोडपासून मजरेवाडी गावात प्रवेश करण्यापूर्वी भोपळे यांच्या शेतात सदानंदी मातेचे मंदिर असून, त्या मंदिराचा विकास हळूहळू वाढत चालला आहे. पूर्वी सदानंदी मातेचे मंदिर एका लहानशा जागेमध्ये होते.

### दसऱ्या दिवशी तलवारीचे पूजन

दसऱ्याच्या दिवशी सदानंदी मातेच्या तलवारीचे पूजन करण्यात येते. त्यानंतर सर्व ग्रामस्थ एकमेकांना सोने (आपट्याचे पान) देवून दसऱ्याच्या शुभेच्छा देतात. अनेक वर्षांपासून ही परंपरा सुरु आहे. सदानंदी मातेची तलवार सुमारे २५ वर्षांपूर्वीची असल्याची माहिती सुधीर भोपळे यांनी दिली. या दिवशी संपूर्ण गावातील तसेच संपूर्ण परिसरातील नागरिक देवीच्या दर्शनासाठी गर्दी करत असल्याचे त्यांनी सांगितले.

### देवीला विड्याच्या पानाचा मंडप

दरवर्षी देवस्थानकडून घटस्थापनेच्या दिवशी विड्याच्या पानाचे मंडप घातले जाते. मात्र गेल्या दोन तीन वर्षापासून ग्रामस्थांकडून तसेच भक्तांकडून वर्गणी गोळा करुन हे विड्याच्या पानाचं मंडप करुन दररोज देवीला अर्पण केले जात आहे.

कालांतराने भक्तांना देवीची प्रचिती आल्यामुळे सर्वांनी लोकवर्गणीतून मंदिराचा जीर्णोध्दार केला. जिर्णोध्दार केलेल्या मंदिराला यंदा २५ वर्षे झाली आहेत. सध्या मातेची दोन मंदिरे असून लहान मंदिरात देवीची मूर्ती आकाराने लहान आहे.

नवरात्र उत्सवाच्या काळात येथील भाविक दोन्ही देवींना नवस बोलतात. हत्तुरेवस्ती, राघवेंद्र नगर, भारतमाता नगरसह ४० नगरांतील भक्त दर्शनासाठी येतात. लक्ष्मण जाधव हे केवळ नवरात्रातच नव्हे तर नित्यनियमाने वर्षभर पूजा करत असतात.

रोज सकाळ ७ वाजता आणि सायंकाळी ७.३० वाजता महाआरती व देवींची पूजा केली जाते. मजरेवाडी गावात सदानंदी माता मंदिरात नवरात्रोत्सव साजरा केला जात असला तरी त्या परिसरात येणारे हत्तुरेवस्ती येथे लक्ष्मी मंदिरात गर्दी असते. तेथे मंडळातर्फे देवीची प्रतिष्ठापना करण्यात आली.

भारत मातानगर, राघवेंद्र नगर, जुळे सोलापुरात जगदंबा नगरासह अन्य काही नगरांत देवी प्रतिष्ठापना करुन नवरात्रौत्सव साजरा केला जातो. एकूण ५६ नगरांची असलेली मजरेवाडी मूळ गावात ग्रामदैवत लक्ष्मी असली तरी नवरात्रौत्सवाच्या काळात लक्ष्मी मंदिराबरोबरच सदानंदी माता मंदिरात नित्यपूजा केली जाते. महिलांची गर्दी लक्षणीय दिसून येते. नवरात्रौत्सव काळात पहाटे पाच ते दुपारपर्यंत तर सायंकाळी ४ ते रात्री ९ पर्यंत गर्दी दिसून येते.



## आज दुर्गाष्टमी



आज महाअष्टमी, तिला 'दुर्गाष्टमी' असेही म्हणतात. नवरात्री सणात आजच्या दिवसाला सर्वाधिक महत्व आहे. कारण आजचा माँ दुर्गा आणि तिच्या नऊ अवतारांना समर्पित आहेत. वाईटावर चांगल्याच्या विजयाचा करून भक्त देवींची आणि तिच्या नऊ रूपांची पूजा करतात. आज नवरात्रीची आठवी माळ असून नवदुर्गेचे आठवे रुप महागौरी देवीला समर्पित आहे. नवरात्रीचा आठवा दिवस अष्टमी तिथी किंवा महाष्टमी व्रत म्हणून पाळला जातो. हिंदू पौराणिक कथेनुसार, देवी शैलपुत्री अत्यंत सुंदर होती आणि वयाच्या १६ व्या वर्षी तिचा रंग गोरा होता. तिच्या गोऱ्या त्वचेमुळे तिला देवी महागौरी म्हणून ओळखले जाऊ लागले. तिची तुलना शंख, चंद्र आणि कुंदाच्या पांढऱ्या फुलाशीही केली जाते.

देवी महागौरी बैलावर आरूढ होते, त्यामुळे तिला वृषारुधा म्हणतात. तिला चार हात आहेत. उजव्या बाजूला एका हातात त्रिशूल आहे आणि दुसरा अभय मुद्रेत आहे. ती एका डाव्या हातात डमरू धारण करते आणि दुसरा वरद मुद्रेत ठेवते. देवी महागौरी नेहमी पांढरी वस्त्रे परिधान करते म्हणून तिला श्वेतांबरधारा असेही म्हणतात.

अष्टमीच्या दिवशी देवी महागौरींची पूजा केल्यास सर्व समस्या आणि पापांपासून मुक्ती मिळते. अष्टमी व्रतालाही महत्त्व आहे.

### शहरातील प्रसिध्द नवरात्रौत्सव मंडळ

शहरातील आराध्यदैवत रुपा भवानी, हिंगुलांबिका देवी, दाजी पेठेतील कालिका देवी, साखरपेठेतील बनशंकरी देवी, बाळीवेस येथील शक्तीपूजा नवरात्र मंडळ, वडार समाजाची महाकालिका देवी, चाटी गल्ली येथील श्री दाधीच समाजाची दधीमती माता, गल्ली येथील शिवशक्ती नवरात्र बहुउद्देशीय मंडळाची देवी प्रामुख्याने प्रसिध्द आहेत. यासह विविध मंडळात आणि मंदिरात अष्टमीनिमित्त होमहवनाचे आयोजन करण्यात आले आहे.


## कमळाच्या फुलांनी करतात दधिमथी देवीची पूजा



कमळाच्या फुलांनी दधिमथी देवीची पूजा करताना भाविक.

श्री दाधीच समाज संस्थेतर्फे चाटी गल्ली येथील गायत्री भवन येथे माँ दधिमथी नवरात्र महोत्सव साजरा करण्यात येतो. राजस्थान जवळील गोठ मांगलोद येथील ही माता आहे. दायमा समाजाची ही कुलदेवी आहे. सोलापुरातील भक्तांना तिथे जाता नाही म्हणून या मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. कमळाच्या फुलांनी करतात दधिमथी देवींची पूजा करण्यात येते.

नवरात्रीत नऊ दिवस विविध धार्मिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले येते. घटस्थापनेच्या दिवशी सम्राट चौकापासून ते गायत्री भवनपर्यंत शोभायात्रा काढण्यात येते. समाजातील स्त्रिया डोक्यावर कलश घेऊन यामध्ये सहभागी होतात. नवरात्रीत नवमीच्या दिवशी म्हणजेच सोमवारी भंडारा आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. १००० नागरिकांसाठी हा महाप्रसाद असणार आहे. महाप्रसाद दुपारी १२ वाजल्यापासून सुरु होणार आहे.




समाजातील नागरिक तसेच बाजारपेठेतील व्यापारी या महाप्रसादाचा लाभ घेतात. वर्षभर मंडळाचे उपाध्यक्ष पुष्कर व्यास यांच्या घरी या देवीची चांदीची मूर्ती असते.

**दरवर्षी येतात चेन्नईहून फुले**

नवरात्र उत्सवानिमित्त खास चेन्नईहून आणण्यात आलेल्या तब्बल दीड हजार कमळाच्या फुलांनी दधिमथी मातेची पूजा करण्यात आली. हा सहस्त्र कमलपुष्प अर्चनेचा कार्यक्रम ललितपंचमीच्या दिवशी झाला. कमळाच्या दीड हजार फुलांनी सजविण्यात आल्याने दधिमथी मातेची मूर्ती आणखीनच विलोभनीय दिसत होती. सहस्र कमलपुष्प अर्चनेवेळी देवीला कमळाचे फूल वाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. गेल्या २० वर्षांपासून दीड हजार कमळाच्या फुलांनी पूजा करण्याचा कार्यक्रम प्रत्येक वर्षी करण्यात येत आहे. यंदाचे हे २१वे वर्ष आहे.

## बनशंकरीदेवीला २५० वर्षांची परंपरा



**कोल्हापूरची श्री महालक्ष्मी व तुळजापूरची भवानीमाता आणि पुण्याची चतु:श्रृंगीदेवी या प्रमाणेच कर्नाटक राज्यातील बागलकोट जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र बदामी येथील प्रसिध्द श्री बनशंकरी (शाकंभरी) देवी तीन आद्यपीठांपैकी एक मानली जाते. ती अनेक भक्तांची कुलदेवी आहे. दुष्काळात आपल्या शरीरातून शाकभाज्या निर्माण करुन भक्तांना तारले म्हणून तिला शाकंभरी असेही म्हणतात. तसेच तीर्थक्षेत्र बदामी येथे बनाच्या रम्य परिसरात स्थानिक झाल्यामुळे बनशंकरी असेही संबोधतात. या देवीचे अखिल भारतातील देवांग हटगार कोष्टी व ब्राह्मण समाजाची श्री बनशंकरी देवी ही कुलदैवता मानली जाते. या देवीचे प्रतिरुप सोलापुरात साखरपेठ येथे असून सदर मंदिर २५० वर्षांपूर्वीचे आहे.**

या देवीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना आद्य जगद्गुरु श्री शंकराचार्य यांनी केली आहे. मंदिर हेमांडपंथी असून, या देवीची मूर्ती काळ्या पाषाण दगडाची आहे. मूर्ती रेखीव आणि तेजस्वी आहे. मूर्ती चतुर्भुजा असून सिंहावर आरुढ झालेली आहे. बनशंकरी देवीने आपल्या हातात त्रिशूल, डमरु, तलवार, अक्षयपात्र इत्यादी आयुधे धारण केली असून या देवीचे स्वरुप उग्र आहे.

या देवीस कुंकुमार्चन केले असता अखंड सौभाग्यवती प्राप्त होते. या देवीच्या डाव्या बाजूस उजव्या सोंडेच्या कृपाभिताची गणपतीची मूर्ती असून उजव्या बाजूस श्री शंभू महादेवाचे लिंग आहे. या देवीचे सभामंडप प्राचीन असून अत्यंत आकर्षक आहे. सभा मंडपात डाव्या बाजूस दुर्गामातेचे चित्र रेखाटले आहे. तर उजव्या बाजूस श्री पार्वती माता आणि शंकराचे चित्र रेखाटले आहे.

आश्विन प्रतिपदेपासून विजयादशमीपर्यंत दररोज श्री बनशंकरी देवीची रुद्राभिषेक, काकडाआरती व पानपूजा, महापूजा, कुंकूमार्चन करुन रात्रीच्या वेळी सामुदायिक आरती करुन प्रसाद वाटप करण्यात येतो. अष्टमीला होमहवन, नवमीदिवशी कुमारीकांचे पूजा करुन, ओटी भरुन, दक्षिणा देऊन भोजन दिले जाते.

विजयादशमीला श्री बनशंकरी देवीच्या मंदिरात सीमोल्लंघन झाल्यानंतर कुंकू उधळण्याचा कार्यक्रम होतो. तसेच शाकंभरी पौर्णिमेला (जानेवारी) तुळजापूरप्रमाणे शाकंभरी नवरात्र उत्सव साजरा केला जातो. लग्नास विलंब होत असल्यास मुलींनी दर शुक्रवारी गजरा अर्पण केल्यास विवाह खात्रीने जमतो.

# जिल्हाधिकाऱ्यांचे विमा कंपनीला आदेश

सुराज्य/सोलापूर



खरीप हंगामातील प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत जिल्ह्यातील लाखो शेतकऱ्यांनी ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीकडे पिक विमा भरला. जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती असल्याने जिल्हा प्रशासनाने विमा कंपनीकडे सादर केलेल्या अहवालानुसार खरीप हंगामातील प्रतिकूल परिस्थितीची अधिसूचना काढलेल्या सर्व पिकासाठी २५ टक्के अग्रीम ॲडव्हान्स तात्काळ द्यावा असे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात खरीप हंगाम प्रधानमंत्री पिक विमा योजना जिल्हास्तरीय समितीच्या बैठक झाली या बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉक्टर तांबडे, शेतकरी प्रतिनिधी सुनील काशीद, उदय नानजकर, तसेच विमा कंपनीचे प्रतिनिधी दीक्षित, केतकी सिंदेकर पुणे येथून ऑनलाइन द्वारे उपस्थित होते. जिल्हा प्रशासनाने खरीप हंगामातील प्रतिकूल परिस्थितीच्या सर्व पिकांसाठी ६ सप्टेंबर, १५ सप्टेंबर, ६ ऑक्टोबर, ८ ऑक्टोबर २०२३ अशा चार अधिसूचना कंपनीकडे सादर केलेल्या आहेत. जिल्ह्यात यावर्षी खरीप हंगामात अत्यंत कमी पाऊस झालेला असल्याने शेतकऱ्यांना विमा कंपनीकडून वेळेत भरपाई रक्कम मिळणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पिक विम्यासाठी प्रीमियम भरलेला असून या सर्व शेतकऱ्यांना तात्काळ २५ टक्के नुकसान भरपाई अग्रीम द्यावे असे आदेश बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. २३ ऑक्टोबर पर्यंत स्कायमेटचा डेटा ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीच्या प्रतिनिधींनी चेक करून ही कार्यवाही पूर्ण करावी अशा सूचना देखिल यावेळी केल्या.

### स्कायमेटचा डेटा चेक करा

स्कायमेटचा डेटा तपासणीबाबत खूपच संथ गतीने काम करत असल्याबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी नाराजी व्यक्त करून कंपनीच्या प्रतिनिधींनी स्कायमेट चा ऑनलाईन डेटा तात्काळ चेक करावा. व शेतकऱ्यांना वेळेत विमा भरपाई रक्कम मिळण्यासाठी सकारात्मकता दाखवावी, कांदा व कापूस पिकाबाबत ही अशीच कार्यवाही करण्याची सुचना जिल्हाधिकाऱ्यांनी केली

### जिल्ह्यात सध्या दुष्काळी परिस्थिती

जिल्ह्यात अत्यंत कमी पाऊस झालेला असून यावर्षी ५० टक्के पेक्षा कमी रब्बी पेरणी होईल. तसेच ऊसाचे क्षेत्र ही कमी होणार असून सध्याची परिस्थिती दुष्काळाची असून कंपनीने सोयाबीन, बाजरी व मका पीका बाबतची विम्याची रक्कम तात्काळ मंजूर करून शेतकऱ्याना वितरित करण्याची मागणी केली. शेतकरी प्रतिनिधी सुनील काशीद व उदय नानजकर यांनीही विमा कंपनीकडे केली

# आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागेपर्यत फुट पडू देऊ नका

## मनोज जरांगे-पाटील यांचे अकलूजच्या सभेत आवाहन

सुराज्य/सोलापूर



मराठ्यांनो वैयक्तिक मतभेद,हेवेदेवे बाजुला ठेवून स्वतःच्या पोरांच्या भविष्यासाठी मराठ्यांनो एकत्र या. आपल्या जातीवर अन्याय होतोय म्हणुन एकजुट झाली आहे. या एकजुटीत आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागेपर्यत फूट पडू देऊ नका असे आवाहन करत समाजाच्या प्रश्नासाठी मी मागे हटणार नाही असा निर्धार मनोज जरांगे-पाटील यांनी अकलूज येथे विशाल मराठा जनसमुदायाला बोलताना व्यक्त केला.

माळशिरस तालुका सकल मराठा समाजाच्यावतीने मनोज जरांगे-पाटील यांची अकलूजच्या विजयसिंह मोहिते-पाटील क्रिडा संकुलावर भव्य सभा पार पडली.यावेळी मनोज जरांगे-पाटील म्हणाले की, सरकारने ४० दिवसाचा वेळ घेतला आहे,त्याची मुदत संपत आली तरी अद्याप ठोस निर्णय झालेला नाही.सरकारने स्थापण केलेली समिती काय करतेय तेच कळत नाही.आता चाळीस दिवसाच्या वर सरकारला एक तास सुध्दा वेळ मिळणार नाही.आंदोलनाची पुढची दिशा उद्या जाहीर करणार आहे. ज्यांना अरक्षण नको आहे त्यांनी घेऊ नका,पण गोरगरीब मराठ्यांच्या पोराचं कल्याण होऊ द्या त्यांच्या अन्नात माती कालवू नका, असे जरांगे म्हणाले.

### आरक्षणासाठी कोणीही आत्महत्या करु नका

शांततेच्या मार्गाने सुरु झालेलं हे आंदोलन शांततेच्या मार्गानेच करुन अरक्षण घ्यायचे आहे.हिंसक आंदोलनाला माझे अजिबात समर्थन नाही.येत्या काळात आरक्षणासाठी कोणीही आत्महत्या करु नका असे आहवानही जरांगे पाटील यांनी उपस्थितांना केले.



## कुचन प्रशालेत ब्रतुकम्मा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा

सोलापूर : ऑक्टोबर पद्मशाली शिक्षणसंस्था संचलित कुचन प्रशाला कनिष्ठ महाविद्यालय व व्यवसाय शिक्षण विभागात देवींच्या आराधनेचा ब्रतुकम्मा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यातआला. सुरुवातीस पद्मशाली शिक्षण संस्थेच्या सहसचिव संगीता इंदापूरे, समाजसेविका विद्या गोप, पर्यवेक्षिका प्रणिता सामल यांच्या हस्ते देवींचे पूजन करुन बतुकम्मा उत्सवास प्रारंभ झाला. तेलंगाणाची परंपरा जपत पद्मशाली शिक्षण संस्थेच्या कुचन प्रशालेत हा कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव दशरथ गोप, भारत जागृतीचे सचिव नवीन आचारींगारु, भारत जागृती संगारेड्डी जिल्हा युथचे प्रेसिडेंट अरुणराज शेरीकरगारु, प्रेसिडेंट-इटाली किशोरगारु, भारत जागृती हैद्राबाद जिल्हा युथचे प्रेसिडेंट नवीनगारु, संस्थेचे विश्वस्त श्रीधर चिट्याल व यशवंत इंदापूरे यांची उपस्थिती होती. वेगवेगळ्या प्रकारच्या रंगीबेरंगी पन्नास किलो फुलांनी या ब्रतुकम्माची रचना करण्यात आली होती. कार्यक्रमास प्रशालेचे प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेर, मल्लिकार्जुन जोकारे, सर्व शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रियांका महिंद्रकर यांनी केले तर आभार पर्यवेक्षिका प्रणिता सामल यांनी मानले.

## जिल्हाधिकाऱ्यांनी केले स्पोर्ट्स एरोबिक्सच्या खेळाडूंचे कौतुक

सुराज्य/सोलापूर

नॅशनल स्पोर्ट्स एरोबिक्स अँड फिटनेस चॅम्पियनशिप जिंकणाऱ्या स्ट्रीमलाईन अकॅडमीच्या खेळाडूंचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कौतुक केले, अशी माहिती जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर यांनी दिली. डॉ. मोहिनी मोरे यांनी प्रशिक्षित केलेल्या या खेळाडूंनी अतिशय लहान वयात राष्ट्रीय पातळीवर ही कामगिरी बजावली आहे. आंतरराष्ट्रीय कोच डॉ. मोरे यांनी या खेळाची माहिती दिली.



शहरात नवरात्रोत्सव सुरू आहे. रविवारी अष्टमी असल्याने होमहवन करण्यासाठी लागणारे भोपळे बाजारात विक्रीसाठी आले आहेत.

## विविध ठिकाणी दोघांची गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

शहरातील अक्कलकोट रोड आणि मुस्ती (ता.दक्षिण सोलापूर) अशा विविध ठिकाणी दोघा विवाहित इसमांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या नोंदी शनिवारी पोलिसात झाल्या आहेत. त्यापैकी पहिली घटना अक्कलकोट रोड येथील किसान नगरात शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. शिवाजी तुकाराम कुंचपकर (वय ४४ रा.किसाननगर सूत मिलच्या पाठीमागे) असे मयताचे नाव आहे.

त्याचा मृतदेह घरातील छताच्या लोखंडी अँगलला साडीने गळफास घेतलेल्या अवस्थेत शनिवारी सकाळी आढळून आला. मयत शिवाजी कुंचपकर हा पेट्रोल पंपावर कामास होता. त्याची पत्नी आणि मुले सणासाठी माहेरी गेले होते. घरात एकटेच असताना त्याने हा प्रकार केला. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.

तर दुसरी घटना मुस्ती (ता.दक्षिण सोलापूर) येथे शनिवारी सकाळी उघडकीस आली. नबीशा इमामशा मकानदार (वय ३८ रा.मुस्ती) असे आत्महत्या केलेल्या विवाहित इसमाचे नाव आहे. त्याचा मृतदेह आज सकाळी सहा वाजेच्या सुमारास गावातील विजेच्या सिमेंटच्या खांबाला पॅन्ट च्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची नोंद वळसंग पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार बंदीछोडे पुढील तपास करीत आहेत.

## व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन महिलेवर अत्याचार; दोघाविरुद्ध गुन्हा

### एकाला ५ दिवसाची कोठडी

पंढरपूर : अंघोळ करणाऱ्या एका महिलेचा व्हिडिओ काढून तो वायरल करण्याची धमकी देऊन तिच्यावर अत्याचार केल्याची घटना पंढरपूर तालुका परिसरात नुकतीच उघडकीस आली. या प्रकरणात पोलिसांनी अत्याचार करणारा आणि त्याचे व्हिडिओ व्हायरल करणाऱ्या अशा दोघाविरुद्ध बलात्कार आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करून एकाला अटक केली.पंढरपूरच्या न्यायालयाने आरोपीला ५ दिवसाची पोलीस कोठडी शनिवारी सुनावली. दत्तात्रय रेवणसिद्ध रणदिवे (वय २४ सुस्ते ता.पंढरपूर) आणि दिलीप तुकाराम घाडगे (रा. सदर) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. त्यापैकी अटकेत असलेल्या दत्तात्रय रणदिवे याला न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली.

ती महिला घराजवळ अंघोळ करीत होती. त्यावेळी रणदिवे याने त्याचे व्हिडिओ काढून व्हायरल करण्याची धमकी देऊन तिच्यावर अत्याचार केला होता. तसेच दिलीप घाडगे याने फोटो काही दिवसापूर्वी वायरल केले होते. पूढील तपास सहाय्यक निरीक्षक पाटील करीत आहेत.

## प्रॉडक्टची माहिती देण्यास बोलावून मारहाण

सोलापूर : शेती विषयक साहित्याची विक्री करणाऱ्या प्रतिनिधींना फोन करून बोलावून त्यांना लाथाबुक्याने मारहाण केल्याची घटना शहरातील कामत हॉटेल जवळ शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. विशाल विलास चव्हाण (वय ३४ रा. पंढरपूर) आणि सिद्धाराम विजापुरे (वय ३९ रा.येळेगाव ता.दक्षिण सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.त्या दोघांना फोन करून सकाळी कामत हॉटेल जवळ बोलावण्यात आले. त्यानंतर त्यांना तुमच्या प्रॉडक्टची माहिती पाहिजे. असे म्हणत शुभम शेवतकर, अक्षय व्हनमाने आणि इतर ५ जणांनी मिळून मारहाण केली. अशी नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे.



## भाजयुमो प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर यांचे सोलापुरात स्वागत

सोलापूर : भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर कोल्हापूर येथे संघटनात्मक दौऱ्यासाठी जात असताना भारतीय जनता युवा मोर्चा सोलापूर वतीनं जुना तुळजापूर नाका येथे जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांना सोलापुरी चादर भेट देण्यात आली.

सोलापूर शहर व जिल्ह्यात युवा मोर्चाच्या माध्यमातून तरुणांची मोठी फळी उभा करून पुन्हा एकदा नरेंद्र मोदींना प्रधानमंत्री बनविण्यासाठी युवा मोर्चा सदैव तत्पर आहे. केंद्राच्या योजनांद्वारे लोकांचे जगणे उंचावले जावे अशी अपेक्षा आहे यातून राज्य व देश सशक्त बनण्याचे कार्य भाजपने हाती घेतला आहे त्यात युवा मोर्चानेही वाटा उचलला असल्याचे लोणीकर म्हणाले. यावेळी प्रदेश सचिव अक्षय अंजिखाने, भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य हेमंत पिंगळे, शहर उपाध्यक्ष सोमनाथ केंगनाळकर, यतीराज होनमाने,राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य संजय साळुंखे, नगरसेवक अमित पाटील, भाजयुमोचे सागर अतनुरे, अंकुश अवताडे,विशाल बनसोडे,ओंकार होमकर,विठ्ठल सरवदे,गुरुराज तगाडे,संदीप काशीद,सिकंदर कतारी,सिद्धांत बिराजदार व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अक्कलकोट, दक्षिण तालुक्यातील दुष्काळाचा फेरसर्वे करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

### आ. कल्याणशेट्टी यांची माहिती

सुराज्य/अक्कलकोट



स्वयंचलित पर्जन्यमापक यंत्राच्या चुकीच्या अहवाल शासनस्तरावर गेल्याने अक्कलकोट व दक्षिण सोलापूर दुष्काळच्या यादीतून वगळले गेले असले तरी शेतकऱ्यांनी घाबरण्याचे कारण नाही. फेरसर्वे करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश काढलेला आहे. जास्ती जास्त नुकसान भरपाई मिळवून देण्याचा माझा प्रयत्न राहील, अशी ग्वाही आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शनिवारी अक्कलकोट भाजपा कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत आमदार कल्याणशेट्टी बोलत होते. विरोधकांनी सरकार व प्रशासनाला दोषी ठरवत आहे. आपल्याला याबाबत राजकारण करायचे नसून दुष्काळ जाहीर करताना ट्रिगर वन ट्रिगर टू पेजच्या अहवालानुसार पर्जन्यमापक यंत्राच्या अहवालानुसार विविध निकष लावून दुष्काळ जाहीर केला जातो.

आपल्या तालुक्यातील यंदाची परिस्थिती वेगळी असून जिथे यंत्र बसविण्यात आले आहे तिथे पाऊस पडला. मात्र ज्या मंडळात पाऊस पडलेला नाही तेथील चुकीचा अहवाल शासन स्तरावर गेल्यामुळे दुष्काळ यादीतून अक्कलकोट व दक्षिण सोलापूरचे नाव वगळण्यात आला आहे. याबाबत विरोधकांनी चुकीच्या माहितीद्वारे उलट सुलट बातम्या देत गैरसमज पसरवत आहेत.

शेतकऱ्यांनी अशा भुलथापांना बळी पडू नये. जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेऊन माहिती दिली असून याबाबत फेरसर्वे करून अहवाल सादर करण्याचे सूचना महसूल विभाग व तालुका कृषी कार्यालयांना जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिलेला आहे, असे आ. कल्याणशेट्टी म्हणाले.

## माझी माती.. माझा देश अभियान १३ अमृत कलशाचे पूजन

सुराज्य/सोलापूर

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सांगता सोहळ्यानिमित्त राज्यात 'मेरी माटी मेरा देश' अर्थात 'माझी माती माझा देश' अभियान सुरू आहे. मिट्टी को नमन वीरो को वंदन या घोषवाक्यासह या अभियानाची सुरुवात झाली. या अभियानांतर्गत अमृत कलशा मध्ये पालिकेचा एक कलश, जिल्ह्यातील पंचायत समितील ११ कलश, जिल्हा प्रशासनाचा एक अशा १३ कलशाचे पूजन यावेळी करण्यात आले.

या अभियानाची सुरुवात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आली. देशासाठी बलिदान दिलेले शहीद जवानांच्या स्मृतीला उजाळा देण्यासाठी आणि त्यांना वंदन करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे यावेळी सर्व मान्यवर व विद्यार्थी यांनी पंचप्राण शपथ घेण्यात आले. कॅम्प व इतर मनपाच्या प्रशाला च्या वतीने देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी उपायुक्त मच्छिंद्र घोलप, जिल्हा प्रशासन अधिकारी आशिष लोकरे, माजी सैनिक महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष अरुण कुमार तळीखेडे, दिवाकर रळेकर, नेहरू युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी अजित कुमार, माळशिरसचे मुख्याधिकारी नितीन गाढवे, श्रीपुर नगरपंचायत चे मुख्याधिकारी कौस्तुभ गव्हाणे, माढाचे मुख्य अधिकारी पूजा दुधनाळे, वैराग चे मुख्य अधिकारी विद्या पाटील, ग्रामविकास अधिकारी वैभव आहाळे, गटविकास अधिकारी महेश पाटील, भारतीय माजी सैनिक संघटना संचालक रणजीत निमंग्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

## संभाजी आरमारचा मंगळवारी १५ वा दसरा दरबार



सोलापूर : संभाजी आरमारच्या स्थापनेपासून विजयादशमीनिमित्त प्रतिवर्षी मोठ्या दिमाखदार पद्धतीने दसरा दरबार आयोजित केला जातो. यंदाचा १५ वा दसरा दरबार मंगळवार २४ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात होणार आहे. या दरबारात माजी सनदी अधिकारी इंद्रजित देशमुख मार्गदर्शन करणार आहेत. संभाजी आरमार वचारांचं सोनं लुटत मागील अनेक वर्षांपासून हा मावळ्यांचा दरबार भरवत आहे. यंदाच्या वर्षी माजी सनदी अधिकारी इंद्रजित देशमुख जनसेवेपायी काय झिजवावी, घाव सोसूनिया मने रिझवावी या विषयावर व्याख्यान होणार आहे. यावेळी सुनील ठेंगील, बाबाजी कलाल, श्रावणी सूर्यवंशी, कुमार चव्हाण यांचा सन्मान केला जाणार आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या शुभहस्ते या दरबाराचा शुभारंभ केला जाणार आहे. पोलीस आयुक्त राजेंद्र माने, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, पालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता आशिष मेहता , उद्योजक सुनील बुरबुरे यांच्या प्रमुख उपस्थित असणार आहेत. सोलापूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संभाजी आरमाराचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांनी केले आहे.

### जलपर्णीमुळे पाण्याला दुर्गंधी, जलप्रदूषणात कमालीची वाढ

# उजनीतील जलचरांचा श्वास गुदमरू लागला

सुराज्य/टेंभुर्णी

सप्टेंबर महिन्याच्या अखेरच्या टप्प्यात उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस झाला. तसेच भीमा व खडकवासला प्रकल्पातून पाणी सोडल्याने उजनी धरणाच्या साठ्यात वाढ झाली. परंतु, पाण्याबरोबरच मोठ्या प्रमाणात जलपर्णी, घातक रासायनिक घटक, सांडपाणी वाहून आल्याने उजनी धरणातील पाणी प्रदूषित झाले आहे. उजनी पाणलोट क्षेत्रातील पळसदेव, काळेवाडी, डिकसळ आदी भागांत मोठ्या प्रमाणात जलपर्णी साठली आहे. त्यामुळे जलचरांचा श्वास कोंडला आहे. जलचरांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे.



देशी-विदेशी शास्त्रज्ञांनी संशोधन करून सदरचे पाणी पिण्यायोग्य नाही हे वारंवार सांगितले आहे. परंतु, राजकीय मंडळींना याकडे लक्ष द्यायला वेळ नाही किंवा ते जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत असेच वाटते. त्यामुळे उजनीला लागलेले प्रदूषणाचे हे ग्रहण कधी सुटणार ? हा मोठा प्रश्नच आहे.

उजनी जलाशयात पुणे जिल्हा व परिसरातील मैला मिश्रित सांडपाणी तसेच रासायनिक कंपन्यांची निरुपयोगी पदार्थ विनाप्रक्रिया आहेत तसे उजनीत सोडले जात आहेत या भयानक प्रदूषणामुळे जलाशयातील पानवनस्पती तसेच जलचरावर विपरित परिणाम होत आहे तसेच वाढणारे पक्षी सौंदर्य कालांतराने कमी होण्यासही हे वरचेवर वाढणारी प्रदूषणास कारणीभूत ठरणार आहे.

उजनी हे राज्यातील सर्वात मोठे धरण म्हणून ओळखले जाते. परंतु, उजनी जलशयातील प्रदूषण कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढतच चालले आहे, ते थांबविण्यासाठी कोणतीही शासकीय यंत्रणा तसेच लोकप्रतिनिधी पुढाकार घेत नसल्याने उजनीतील जलप्रदूषण घातक पातळीवर पोहोचले आहे. पुणे, कुरकुंभ, पिंपरी-चिंचवड शहरांतील कंपन्यांतून सोडण्यात येणाऱ्या रासायनिकयुक्त पाण्यामुळे उजनीचे प्रदूषण कमाल पातळीवर पोहोचले आहे. राज्य सरकार, प्रदूषण नियंत्रण मंडळ व सामाजिक संस्था याकडे दुर्लक्ष करीत आहेत. उजनीतील प्रदूषण कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना न केल्यास लवकरच तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते आप्पा वाकळे यांनी दिला.

### जलाशयाच्या पाण्याला आला हिरवा रंग...

सोलापूरसह पुणे तसेच अहमदनगर जिल्ह्यासाठी वरदायिनी असणाऱ्या उजनी जलाशयाच्या पाण्याला हिरवा रंग आला असल्यामुळे हे पाणी पूर्णपणे प्रदूषीत झाले आहे. डिकसळ पूल, खातगाव, टाकळी, रामवाडी, पोमलवाडी, केत्तूर, गोयेगाव, वाशिंबे, उमरड, सोगाव आदी उजनी लाभक्षेत्रातील पाण्याला हिरवा रंग आला आहे. कालव्याद्वारे सोडण्यात आलेले पाणी पण हेच असल्याने शेती व पिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

या पाण्यामुळे परिसरातील जनावरांच्या प्रजनन क्षमतेवरही परिणाम होत आहे. गेल्या काही वर्षापासून उजनीची पाणी प्रत्येकवर्षी प्रदूषित होत असताना शासन मात्र एखादी मोठी दुर्घटना घडण्याची वाट पाहत आहे काय ? एकेकाळी पिण्यायोग्य असलेले पाणी आता मात्र हातात घेण्यासही लायक राहिले नाही ही शोकांतिका आहे.

**– प्रा. मोहन भोसले,**
प्रगतशील बागायतदार बेंबळे